RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

**दि. ०९ ऑगस्ट २०२६**

१९२७- अंबरनाथ (ठाणे) येथे अस्पृश्यांची सभा.
१९३०- नागपूर येथे अखिल भारतीय बहिष्कृत वर्गाची परिषद.
१९५६- औरंगाबाद शेड्युल कास्ट फेडरेशन च्या कमिटीपुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
विश्व आदीवासी दिवस.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार, ०८ ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २२० | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Saturday, ०९ August 2026 | Year : 6 | Issue : 220 | Daily | Rate: Rs. 5/-

# वंचितांच्या प्रगतीची व्यवस्थेने घेतली धास्ती !

## उपवर्गीकरणाच्या माध्यमातून अनुसूचित जातीत फूट पाडण्याचा डाव : खासदार श्यामकुमार बर्वे
## राष्ट्रीय आरक्षण संवर्धन परिषदेत उपवर्गीकरणाला तीव्र विरोध; ५९ जातींच्या एकजुटीचा निर्धार

**नागपूर** : संविधानाने वंचित समाजाला शिक्षण, समानता, स्वाभिमान आणि विकासाची संधी दिली. या घटनात्मक अधिकारांच्या बळावर गेल्या ७५ वर्षांत अनुसूचित जातीतील समाजाने प्रगतीची वाटचाल केली. मात्र, वंचितांच्या या प्रगतीची व्यवस्थेने धास्ती घेतली असून, उपवर्गीकरणासह विविध षडयंत्रांच्या माध्यमातून अनुसूचित जातीतील समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा घणाघाती आरोप खासदार श्यामकुमार बर्वे यांनी केला.

आरक्षण उपवर्गीकरण विरोधी समितीतर्फे डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित 'राष्ट्रीय आरक्षण संवर्धन परिषदे'त ते बोलत होते. उद्योजक गुणवंत देवपारे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. आमदार राजकुमार बडोले, ॲड. शैलेश नारनवरे, चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, बानाईचे अध्यक्ष अरविंद गेडाम, इंजि. कुलदीप रामटेके, बाहोचे अध्यक्ष डॉ. संजय रामटेके, विचारवंत रमेश कटके आणि ॲड. स्मिता कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

खासदार बर्वे म्हणाले की, संविधानामुळे मागासवर्गीय समाजाला अधिकार मिळाले. या अधिकारामुळे समाज शिक्षित, जागरूक झाला आणि आपल्या हक्कांसाठी लढण्याचे बळ त्याला मिळाले. व्यवस्थेला प्रश्न विचारण्याची ताकद वंचित समाजात निर्माण झाली. हीच बाब व्यवस्थेला मान्य नसल्याने उपवर्गीकरणाचे शस्त्र वापरून समाजात फूट पाडण्याचा डाव आखला जात आहे. आता आपले घटनात्मक अधिकार वाचविण्याची जबाबदारी समाजावर आली आहे.ॲड. शैलेश नारनवरे यांनी उपवर्गीकरणाला घटनात्मक प्रक्रियेच्या दृष्टीने आक्षेप घेतला. संबंधित प्रकरण सर्वोच्च न्यायालयातील खंडपीठांसमोर कशा पद्धतीने गेले, याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून अनुसूचित जातींच्या एकजुटीवर परिणाम होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. उद्योजक गुणवंत देवपारे यांनी अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींना संघटित करून उद्योजकतेच्या माध्यमातून सक्षम करण्याची गरज व्यक्त केली.




### नोकरीतील रिक्त पदांवर चर्चा करा : खामकर

चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी उपवर्गीकरणाच्या चर्चेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मागासवर्गीयांच्या नोकरीतील सुमारे अडीच लाख जागा रिक्त आहेत, तर सुमारे एक लाख कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळालेली नाही. या गंभीर प्रश्नांवर अपेक्षित चर्चा होत नसताना उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजात फूट पाडली जात असल्याच्या मुद्द्यावर मोठ्या प्रमाणात चर्चा केली जात आहे, असे ते म्हणाले. अनुसूचित जातीतील ५९ जातींची वज्रमूठ हीच प्रगतीची खरी वाट आहे, असे सांगत खामकर यांनी एका समाजाचे हित डोळ्यासमोर ठेवून उपवर्गीकरणाला प्रोत्साहन देण्याचा आरोप केला.

### 'समितीच बेकायदेशीर' : बडोले

आमदार राजकुमार बडोले यांनी महाराष्ट्रातील उपवर्गीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या रचनेवर आक्षेप घेतला. अनुसूचित जातींच्या ५९ जातींच्या प्रतिनिधित्वाचा विचार करता, प्रत्येक जातीचा किमान एक प्रतिनिधी असलेली व्यापक समिती असणे आवश्यक होते. मात्र, निवृत्त न्यायाधीश बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आणि सरकारला अपेक्षित असलेला अहवाल घेण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. समितीने राज्यभर सखोल अभ्यास करून प्रत्येक समाजाची स्थिती जाणून घेणे अपेक्षित होते. मात्र, तसे झाले नसल्याने ही समितीच बेकायदेशीर असल्याचा आरोप बडोले यांनी केला.

समाजातील तरुणांनी शिक्षणासोबत उद्योग-व्यवसायाकडे वळून आर्थिक स्वावलंबन साधावे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. संजय रामटेके यांनीही मार्गदर्शन केले. तेलंगणातील मोलपल्ली लक्ष्मैया यांनी दृकश्राव्य माध्यमातून परिषदेला मार्गदर्शन केले. ते म्हणाले या लढ्यात बाहो सोबत आहे.

परिषदेच्या माध्यमातून अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींच्या एकजुटीचा आणि आरक्षणाच्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणाचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

परिषदेचे ठराव इंजि. कुलदीप रामटेके यांनी मांडले.परिषदेचे प्रास्ताविक व संचालक अमन कांबळे व प्रीतम बुलकुंडे ॲड. आकाश मून यांनी केले.

यावेळी परिषदेला सहकार्य करणाऱ्या वकील संघटनेचा धन्यवाद देत रोशन बागडे व त्यांच्या सहकाऱ्यांचा सन्मान केला.

## 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक मुलाखती आता गुजरातीत




**नागपूर** : संविधाननिर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुलाखतींचा महत्त्वपूर्ण संग्रह असलेला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक मुलाखती' हा मराठी ग्रंथ आता गुजराती भाषेत उपलब्ध झाला आहे. या मराठी ग्रंथाचे संपादन कवी-लेखक महेन्द्र गायकवाड यांनी केले आहे. यापूर्वी मराठी आणि हिंदीमध्ये उपलब्ध असलेल्या या ग्रंथाचा गुजराती अनुवाद मुलजीभाई खुमान यांनी अलिकडेच केला असून अहमदाबाद येथील नवभारत साहित्य मंदिरने तो प्रकाशित केला आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक मुलाखती' या ग्रंथात विविध पत्रकार आणि विचारवंतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घेतलेल्या मुलाखतींचा समावेश आहे. या मुलाखतींमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि शैक्षणिक विचार स्पष्ट होतात. धर्मव्यवस्थेबाबत त्यांनी केलेले चिकित्सक विचार, बौद्ध धम्माविषयीचे मत आणि वंचित-बहुजन समाजाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, याबाबतची त्यांची भूमिका या ग्रंथातून समोर येते. या ग्रंथाचा हिंदी अनुवाद अभ्यासक डॉ. अनिल गजभिये यांनी केला आहे. आता हा ग्रंथ मुलजीभाई खुमान यांनी गुजराती भाषेत अनुवादित केला असून अहमदाबाद येथील नवभारत साहित्य मंदिरने प्रकाशित केला आहे. यामुळे ही साहित्यकृती आता तीन भाषांत उपलब्ध झाली असून अन्य भाषांतही हा ग्रंथ अनुवादित होईल, असे कवी-लेखक महेन्द्र गायकवाड यांनी सांगितले.



## चंबा येथे रस्ते अपघातात सात जण ठार, 11 जण जखमी

**चंबाः** आज सकाळी तिस्सा-बैरागढ मार्गावर झालेल्या एका अपघातात सात जणांचा मृत्यू झाला आणि 11 जण गंभीर जखमी झाले. ही खासगी बस बैरागढहून चंबाकडे निघाली होती, परंतु देविकोठीजवळील 'चालुज' वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. परिणामी, बस रस्त्यावरून खाली कोसळली आणि खाली असलेल्या दुसऱ्या रस्त्यावर जाऊन पडली.

अपघाताच्या मोठ्या आवाजामुळे स्थानिक लोक घटनास्थळी धावून आले; त्यांनी पोलिसांना माहिती दिली आणि मदत व बचावकार्य सुरू केले. त्यानंतर काही वेळातच पोलीस, अग्निशमन दलाचे जवान आणि प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली आणि बचावकार्य अधिक वेगाने सुरू झाले. सुरुवातीला तीन मृतदेह बाहेर काढण्यात आले, परंतु बसचा चक्काचूर झाल्यामुळे आत अडकलेल्यांना बाहेर काढणे कठीण झाले होते. बचावकार्य जलद करण्यासाठी दोन जेसीबी (JCB) यंत्रे मागवण्यात आली; अडकलेल्या प्रवाशांना अखेर बाहेर काढण्यात आले, मात्र तोपर्यंत आणखी चौघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. याव्यतिरिक्त 11 जखमींना बसच्या ढिगाऱ्यातून बाहेर काढून उपचारासाठी तिस्सा रुग्णालयात पाठवण्यात आले.

चुराहचे एसडीएम (SDM) राजेश कुमार जरयाल यांनी सांगितले, या अपघातात सात जणांचा मृत्यू झाला आहे. स्थानिकांच्या मदतीने बचावकार्य राबवण्यात आले. योग्य वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्यात आली असून जखमींना रुग्णालयात नेण्यात आले आहे. 11 जखमींपैकी सहा जणांना तिस्सा येथे प्राथमिक उपचार दिल्यानंतर चंबा मेडिकल कॉलेजमध्ये हलवण्यात आले आहे.

अपघातास कारणीभूत ठरलेली खासगी बस आज सकाळी 6:30 वाजता बैरागढहून चंबाकडे निघाली होती. अवघे तीन किलोमीटर अंतर कापल्यानंतर चालुज वळणाजवळ ती दरीत कोसळली आणि खालील रस्त्यावर जाऊन पडली. अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून अपघाताच्या कारणांचा तपास सुरू केला आहे.

## झारखंड : सरकार आणि आंदोलकांमधील चर्चा निष्फळ

**रांची** : झारखंडची राजधानी रांची येथे सध्या JPSC-JSSC परीक्षा पद्धतीत सुधारणा आणि पारदर्शकतेच्या मागणीसाठी शहरातील जयपाल सिंग मुंडा स्टेडियममध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. शनिवारी जेपीएससी-जेएसएससी उमेदवार न्याय मंच (देवेंद्रनाथ महातो गट) आणि सरकारने नियुक्त केलेल्या प्रतिनिधी मंडळात चर्चा झाली. परंतु त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. वृत्तानुसार, विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ आणि सरकारने नियुक्त केलेले प्रतिनिधी मंडळ यांच्यात रांचीच्या मोराबादी येथील स्टेट गेस्ट हाऊसमध्ये चर्चा झाली. या चर्चेतून कोणताही ठोस परिणाम साधला गेला नाही. परिणामी, JLKMचे आंदोलन जयपाल सिंग स्टेडियमवर सुरूच राहील. JLKM नेते देवेंद्र नाथ महातो हे या विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ गेल्या सहा दिवसांपासून उपोषणावर आहेत.

सरकारी शिष्टमंडळात मंत्री दीपिका पांडे सिंग, सुदिव्य कुमार सोनू आणि संजय कुमार यादव यांचा समावेश होता. तर विद्यार्थी गटात दीनबंधू मंडल, पूजा कुमारी, चंदन कुमार, बिमल कुमार, प्रेम कुमार, रवी शंकर, अमित कुमार शर्मा आणि रामावतार महातो यांचा समावेश होता. सरकारने Jpsc.jssc.feed-back@gmail.com नावाचा एक ईमेल पत्ता शेअर केला आहे, जेणेकरून दूरच्या ठिकाणांहून रांचीला प्रवास करू न शकणारे विद्यार्थी त्यांच्या तक्रारी आणि सूचना पाठवू शकतील. सरकारी शिष्टमंडळाने दुसऱ्या आंदोलक गटातील विद्यार्थी शिष्टमंडळाशी चर्चा केली, परंतु कोणताही ठोस तोडगा निघाला नाही. आज आणखी एक बैठक झाली, परंतु चर्चेतूनही काही निष्पन्न झाले नाही. संवादासाठी सर्व पर्याय खुले आहेत असे सरकारने सांगितले आहे.

विद्यार्थ्यांच्या मागण्या अशा आहेत की, जेपीएससी-जेएसएससी परीक्षा पद्धतीत सुधारणा आणि पारदर्शकता असावी. १४व्या जेपीएससी परीक्षेतील अनियमिततेची चौकशी केवळ सीआयडीनेच नव्हे, तर सीबीआय आणि ईडीमार्फत व्हावी. कारण उमेदवारांचा सीआयडीच्या तपासावर विश्वास नाही. एक जलदगती न्यायालय स्थापन करण्याची गरज आहे. खटल्याला गती देण्यासाठी आणि निर्धारित वेळेत न्याय मिळावा यासाठी ठराविक कार्यपद्धती हवी. TDPLद्वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षा रद्द कराव्यात आणि TDPLला काळ्या यादीत टाकावे. तसेच भविष्यातील सर्व स्पर्धा परीक्षा पारदर्शक आणि विश्वासार्ह कंपन्यांमार्फत घ्याव्यात.

### आंदोलक विद्यार्थ्यांची तब्येत बिघडली, एक रुग्णालयात दाखल



आंदोलक गेल्या ६ दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. त्यापैकी काही उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांची तब्येत बिघडली आहे. उपोषणकर्ता राहुल क्रांती याची शुक्रवार प्रकृती बिघडली. राहुल यांच्या रक्तातील साखरेची पातळी अचानक खालावली. डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर त्यांना उपचारांसाठी सदर रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे. राहुल क्रांती यांची प्रकृती पाहता त्यांना ताबडतोब वैद्यकीय पथकाच्या निरीक्षणाखाली ठेवण्याचा सल्ला देण्यात आलाय. तसेच दुसऱ्या बाजूला सातत्याने वैद्यकीय पथकाकडून उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांची तपासणी केली जात आहे. राहुल क्रांती व्यतिरिक्त इतर 7 उपोषणकर्त्यांची तब्येत सातत्याने खालावत आहे. काही उपोषणकर्त्यांना अशक्तपणा जाणवत आहे. तसेच या उपोषणकर्त्यांना इतर समस्यांचा सामना करावा लागत आहे. या उपोषणकर्त्यांवर डॉक्टरांकडून लक्ष ठेवलं जात आहे. आंदोलनात सहभागी झालेले विद्यार्थी नेते देवेंद्र नाथ महातो यांची प्रकृतीही खालावली असल्याचं म्हटलं जात आहे.




## 'मला अटक करण्याचा सरकारचा डाव' : मनोज जरांगे



**जालनाः** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचं पाहायला मिळत आहेत. काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा तापण्याची चिन्ह आहेत. यातच मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुती सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. जात वैधता प्रमाणपत्र रद्द केले जात असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. याच मुद्यांवर बोलताना आज मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर गंभीर आरोप केला आहे. 'मला अटक करण्याचा सरकारचा नवा डाव आहे', असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. तसेच मला फक्त अटक करून दाखवाच, असा इशाराही जरांगे यांनी सरकारला दिला आहे.









09 August 2026 page 02_Layout 1 08-08-2026 05:34 PM Page 1



# उत्सव नव्हे, व्यवस्थेला जाब विचारण्याचा दिवस!

**९ ऑगस्ट आला की सरकार, प्रशासन, राजकीय पक्ष आणि विविध संस्था 'विश्व आदिवासी दिनाच्या शुभेच्छा' देण्यात व्यस्त होतात. रंगीबेरंगी सांस्कृतिक कार्यक्रम, भाषणे, घोषणांचा पाऊस आणि विकासाच्या गप्पा सुरू होतात. पण या सगळ्या गदारोळात एक प्रश्न कायम अनुत्तरित राहतो, देशाचा मूळ निवासी असलेला आदिवासी आजही सर्वाधिक उपेक्षित का आहे? जर तीन दशकांपासून जागतिक आदिवासी दिन साजरा होत असेल, संविधानाने संरक्षण दिले असेल, हजारो कोटी रुपयांच्या योजना राबवल्या जात असतील, तर आदिवासी अजूनही दारिद्र्य, कुपोषण, अशिक्षण, विस्थापन आणि अन्यायाच्या विळख्यात का अडकलेला आहे?**




## विश्व आदिवासी दिवस

सत्य हे आहे की भारतात आदिवासींच्या विकासापेक्षा त्यांच्या संसाधनांवर डोळा ठेवणाऱ्यांची संख्या अधिक आहे. जल, जंगल आणि जमीन हे आदिवासींचे जीवन आहे; पण विकासाच्या नावाखाली त्यांच्याकडून सर्वप्रथम हिरावून घेतले जाते ते हेच जीवन. धरणे, खाणी, औद्योगिक प्रकल्प, महामार्ग, अभयारण्ये आणि कॉर्पोरेट गुंतवणुकीच्या नावाखाली लाखो आदिवासी आपल्या पिढ्यानपिढ्यांच्या भूमीतून उखडले गेले. पुनर्वसनाची आश्वासने दिली गेली; पण वास्तवात अनेकांना ना जमीन मिळाली, ना रोजगार, ना सन्मान. सर्वात मोठा प्रश्न सरकारच्या इच्छाशक्तीचा आहे. संविधानातील पाचवी अनुसूची, पेसा कायदा, वनहक्क कायदा, आदिवासी उपयोजना, आरक्षण, शिक्षण आणि रोजगाराच्या योजना, सर्व काही उपलब्ध आहे. पण अंमलबजावणीच्या पातळीवर भ्रष्टाचार, लालफीतशाही आणि राजकीय उदासीनता यामुळे हे कायदे अनेकदा केवळ कागदावरच राहतात. आदिवासी विकासासाठी मंजूर झालेला निधी खर्च न होणे, दुसरीकडे वळवला जाणे किंवा भ्रष्टाचारात गडप होणे ही वस्तुस्थिती लपून राहिलेली नाही. मग प्रश्न असा आहे की, आदिवासींच्या नावाने राजकारण करणाऱ्यांना त्यांच्या विकासाची खरीच इच्छा आहे का?

याहूनही गंभीर बाब म्हणजे आदिवासींना त्यांच्या जंगलातून हुसकावून लावणारेच पर्यावरणाचे ठेकेदार बनतात. शतकानुशतके जंगलांचे रक्षण करणाऱ्या आदिवासींवर अतिक्रमणाचे गुन्हे दाखल होतात; पण हजारो हेक्टर जंगल नष्ट करणाऱ्यांवर कारवाई होत नाही. हा न्याय नाही; हा सत्तेच्या बळावर चालणारा दुहेरी मापदंड आहे.

राजकीय पक्षांचाही ढोंगीपणा लपून राहिलेला नाही. निवडणुकीच्या काळात आदिवासींच्या झोपडीत जाऊन फोटो काढणारे नेते, सत्तेत आल्यानंतर त्याच झोपडीकडे फिरकण्याचेही कष्ट घेत नाहीत. आदिवासी समाजाचा वापर मतपेटीसाठी होतो; पण निर्णयप्रक्रियेत त्यांचा प्रभावी सहभाग दिसत नाही. संसद, विधानमंडळ आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व असले तरी धोरणनिर्मितीवर त्यांचा प्रभाव अत्यल्प आहे. ही लोकशाहीची शोकांतिका आहे.



प्रा. संध्या राजुरकर
निवासी संपादक

मात्र आत्मपरीक्षणाची गरज केवळ सरकारनेच नाही, तर आदिवासी समाजानेही आहे. शिक्षण हा परिवर्तनाचा सर्वात मोठा मार्ग आहे. आजही अनेक भागांत शिक्षणापेक्षा जगण्याची लढाई मोठी आहे. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, अंतर्गत गटबाजी आणि राजकीय आश्रित मानसिकता यापासून मुक्त होऊन ज्ञान, संघटन आणि स्वाभिमानाचा मार्ग स्वीकारावा लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा संदेश आदिवासी समाजासाठी तितकाच महत्त्वाचा आहे, जितका इतर वंचित समाजांसाठी होता.

आदिवासी संस्कृती ही भारताच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. त्यांची भाषा, लोककला, निसर्गाशी असलेले नाते, सामुदायिक जीवनपद्धती आणि पर्यावरणपूरक जीवनशैली ही आधुनिक जगालाही शिकण्यासारखी आहे. परंतु दुर्दैवाने तथाकथित मुख्य प्रवाहात सामील करण्याच्या नावाखाली त्यांच्या संस्कृतीचे अस्तित्वच धोक्यात आणले जात आहे. विकासाचा अर्थ संस्कृतीचा विनाश नसतो; विकासाचा अर्थ सन्मानाने जगण्याची संधी असतो. आज गरज आहे ती आदिवासी समाजाला दयेचा विषय म्हणून नव्हे, तर संविधानिक अधिकार असलेल्या नागरिक म्हणून पाहण्याची. त्यांच्या जमिनीवर, जंगलावर, संस्कृतीवर आणि निर्णयप्रक्रियेत सहभागावर कोणताही आघात हा केवळ आदिवासी समाजावरील अन्याय नसून भारतीय संविधानाच्या आत्म्यावरच घाव आहे. विश्व आदिवासी दिनानिमित्त सरकारने शुभेच्छा देण्यापेक्षा एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी. गेल्या तीस वर्षांत आदिवासी विकासासाठी किती निधी मंजूर झाला, किती खर्च झाला, किती लोक विस्थापित झाले, किती वनहक्क प्रलंबित आहेत, किती आश्रमशाळा शिक्षकांविना आहेत, किती आदिवासी युवक बेरोजगार आहेत आणि किती कुटुंबे अजूनही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे मिळाली, तर वास्तव देशासमोर येईल.

९ ऑगस्ट हा नृत्य, ढोल, ताशा आणि घोषणांचा दिवस नाही. हा दिवस सत्तेला आरसा दाखवण्याचा आहे. आदिवासींना दयेची भीक नको; त्यांना संविधानाने दिलेले हक्क हवेत. त्यांना विकासाच्या नावाखाली विस्थापन नको; विकासातील समान भागीदारी हवी. जोपर्यंत जल, जंगल, जमीन, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि स्वाभिमान यांवर आदिवासींचा समान हक्क प्रत्यक्षात प्रस्थापित होत नाही, तोपर्यंत विश्व आदिवासी दिन हा उत्सव नसून लोकशाहीच्या अपूर्ण वचनांची आणि व्यवस्थेच्या अपयशाची जिवंत साक्ष राहील.●●




# भाविकांचे आश्चर्यकारक मौन !

**अयोध्येतील राम मंदिर चोरी प्रकरणावरून वर्तमान संसद सत्रात विरोधी पक्षांनी चर्चेची मागणी करून सरकारची कोंडी केल्याचे दिसून येते. दोन्ही सदनाचे काम गेल्या काही दिवसांपासून आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज आणि राम मंदिर चोरीच्या मुद्यावर स्थगित होत आहे. राम मंदिर चोरी प्रकरण समाजाच्या नैतिक, न्यायिक आणि कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेला आव्हान देणारे ठरत आहे. येत्या उत्तरप्रदेश निवडणुकांपर्यंत हा मुद्दा विरोधक आणि प्रामुख्याने समाजवादी पार्टी तापवत ठेवेल असे संकेत दिसतात. हे असले तरी या संदर्भात भाविकांचे मौन अधिक आश्चर्यकारक असे दिसते.**

संत गाडगेबाबा म्हणायचे, 'मंदिरात देव नसतो तर पुजाऱ्याचे पोट असते.' या त्यांच्या वाक्याची सत्यता या निमित्ताने पटते. अयोध्येतील राम मंदिर आणि आसपासचा परिसर या संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आल्यापासून जमीन खरेदी आणि अन्य मुद्द्यांवर चर्चेत आहे. त्यात दानकर्त्यांना दानाची पावती न मिळणे, मर्जीतील लोकांना कामाचे वाटप, ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात केलेली वक्तव्ये संशयास्पद आहेत. प्रामुख्याने ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी यांचे 'मला तेथील व्यवहार फारसे माहीत नाहीत आणि माझ्या सहीने व्यवहार होत नव्हते.' ही कबुली संशय अधिक गडद करते. कारण कोषाध्यक्ष हा कोणत्याही संस्थेत आर्थिक व्यवहारातील महत्वाचा घटक आहे. राम मंदिर निर्मिती ही सर्वोच्च न्यायालयाच्या निवड्यानंतर सरकारने एक ट्रस्ट स्थापन करून केली आहे. निर्मिती, लोकार्पण सोहळा यात सरकारची भूमिका ठळक होती. त्याशिवाय भाजपची मातृत्व संस्था आरएसएसचे वर्चस्व होते. त्याच्याच संलग्न संस्थेकडे निर्मितीचे कार्य सोपविण्यात आले. पसंतीच्या व्यक्ती तेवढ्या या ट्रस्टमध्ये होत्या. त्यामुळे या चोरी खुलाश्यानंतर विनय कटियार, प्रवीण तोगडिया या बजरंग दल आणि विहिंपशी भूतपूर्व संबंधित व्यक्तींच्या प्रतिक्रिया ट्रस्ट पदाधिकाऱ्यांवर थेट आरोप करणाऱ्या होत्या. त्याचबरोबर धार्मिक क्षेत्रातील संत, महंत, आखाडे प्रमुख, यांनीही विरोधी स्वर उजागर केला आहे. स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी ट्रस्ट भंग करण्याची मागणी केली. निर्मोही आखाड्याचे प्रमुख आणि या केसमधील एक पक्षकार महंत द्विपेंद्र दास यांनी 'वहा रावण पहुंच गया' अशी कडवट प्रतिक्रिया दिली. महंत धर्मदास यांनी राम मंदिर व्यवस्थापनाची जबाबदारी महंतांकडे सोपविण्याची मागणी केली. शिवाय तेथील पूजाविधी रामानंदी परंपरे नुसार होत नसल्याचे महंतांनी आरोप केलेत. आतापर्यंत मुकाट्याने सर्व बघूनही, माहिती असूनही प्रतिक्रिया न देणाऱ्या महंत, साधू-संतांना संधी मिळाली आणि त्यांनी घेतलेली भूमिका मतपेढीला धक्का देणारी ठरू शकते याचा अंदाज सरकारला येत असावा.



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

हे प्रकरण उजागर झाल्यानंतर काही सेलिब्रिटी, गणमान्य नागरिक, काही संघटनांचे पदाधिकारी यांच्या प्रतिक्रिया संविधान चौकट आणि कायद्याचे राज्य ही संकल्पना नाकारणाऱ्या होत्या. हिंदू धर्मातील बाबीत इतरांनी दखल देण्याची गरज नाही. ही भूमिकाच न्यायचे राज्य संकल्पना अमान्य करणारी आहे. चोरी ही चोरीच. त्याबाबत रीतसर चौकशी होऊन आरोपीला शिक्षा होणे अशी भूमिका असायला हवी. या प्रकरणावर भाविकांचे मौन मात्र आश्चर्यकारक असे आहे. आपल्या श्रद्धांचा खेळखंडोबा होतांना बघूनही ते शहाणपण घेत नसतील तर अवघड आहे. इथे कार्ल मार्क्सचे सुपरिचित वचन 'धर्म ही अफूची गोळी आहे' याची प्रत्यक्ष प्रचिती येते. या देवभोळेपणामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक भार सहन करावा लागतो. शिवाय विज्ञानवादी दृष्टिकोनापासून ते अलिप्त असतात. या प्रकरणी संसदेच्या आवारात पथनाट्य, घोषणा याद्वारे विरोधी पक्षाने कोंडी करून सरकारला बॅकफूटवर नेले आहे, असे चित्र सध्या तरी दिसते. पण, एक बाब लक्षात घेण्यासारखी इथे असे काही होत आहेत याची भनक अयोध्या वासियांना लागली होती काय? म्हणूनच त्यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवाराचा पराभव केला काय? संघाने नुकतेच शताब्दी वर्ष साजरे केले. त्या आनंदात मश्गूल असतांनाच युवकांचे आंदोलन, राम मंदिर चोरी प्रकरण त्यावर शिंतोडे उडविणारे आहे. सोबतच देशपातळीवर आर्थिक, धार्मिक, परराष्ट्र, शिक्षण, रोजगार, कायदा - सुव्यवस्था यात स्वयंसेवक अनुत्तीर्ण होत असल्याचे ठळकपणे नजरेत भरते. वास्तविक, कोणत्याही व्यवहार आणि व्यवस्थापनात पारदर्शीपणा असणे गरजेचे आहे. भाविकांनीही यातून धडा घेऊन आपल्या भूमिकांची तपासणी स्वतः करणे काळाची हाक आहे.●●

# त्याग, निष्ठा व समर्पणाचे प्रतिक श्रीकृष्ण उबाळे




आंबेडकरी चळवळीतील बुद्धीजीवी प्रवाही नेते कालकथित श्रीकृष्ण उबाळे यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील तिवसा तहसिल मधील वणी ममदापूर येथे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत दि.१० मे १९४७ रोजी झाला. ते बालपणापासूनच जिद्दी, साहसी व मेहनती असल्याने त्यांनी कठीण परिस्थितीला न जुमानता कठोर परीश्रमाने आपली वाटचाल सातत्याने सुरू ठेवली. त्यांनी आपले शालेय शिक्षण जि.प.च्या शाळेमध्ये पुर्ण केले आणि इयत्ता १० वी नंतर त्यांनी सैनिकी पेशा स्वीकारला व सन १९६५ ते १९७३ पर्यंत जवळपास आठ वर्षे देशाच्या सरहद्दीवर राहून त्यांनी प्रामाणिकपणे देशाची सेवा केली. सेवा देत असतांनाच त्यांच्यात उपजतच असलेली सामाजिक जाणीव त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. याला कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' हे शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी आपले खंडीत झालेले शिक्षण पुर्ववत सुरू केले. आपले संपूर्ण लक्ष शिक्षणाकडे केंद्रीत करून सेवेत असतांनाच त्यांनी बहिण शाल विद्यार्थी म्हणून बी.ए.ची पदवी प्राप्त केल्यानंतर, त्यांनी १९७३ ला आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि लगेच १९७४ ला नागपूर येथील महालेखापाल कार्यालयात ऑडीटर म्हणून कार्यरत असतांनाही त्यांची वरीष्ठ पदावर जाण्याची आंतरीक इच्छा होती, त्यामुळे ते वेगवेगळ्या खात्याच्या परीक्षा देतच होते, अशातच त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूर येथे कॉईन नोट एक्झामिनर या उच्चपदावर सेवा करण्याची संधी मिळाली. नागपूर येथे सेवेत असतांनाच देशात कालकथीत कांशीरामजींच्या नेतृत्वाखाली बहुजन समाजाची चळवळ जोर पकडत असतांना ते १९७८ ला बहुजनांचे नेते मा. कांशीराम साहेबांच्या संपर्कात आले व नंतर श्रीकृष्ण उबाळे हे फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीत सक्रिय कार्यकर्ते म्हणून पुढे येऊन कांशीरामजींच्या नेतृत्वाखालील चळवळीशी जुळल्या गेले आणि कांशीरामजींच्या तालमीत त्यांच्या खांद्याला खांदा लावून निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून कार्य करीत असल्याने साहजिकच त्यांच्याकडे महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी चालून आली. आलेल्या संधीचे सोने करण्यासाठी त्यांनी बहूजन समाज पार्टीचे कार्य महाराष्ट्रच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात भ्रमंती करून आंबेडकरी चळवळीला नव्याने उभारी देण्याचे कार्य केले. हे करीत असतांना पक्षाला पूर्ण वेळ देता यावा, यासाठी त्यांनी रिझर्व्ह बँकेतील उच्चपदाच्या नोकरीचा राजीनामा देऊन चळवळीला पूर्णपणे वाहून घेतले. १९८४ मध्ये बहुजन समाज पार्टी विदर्भ प्रदेशचे ते संघटक होते तर १९८६ ते १९९७ पर्यंत सलग ११वर्षे महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष होते. त्या दरम्यान त्यांनी बहुजन समाज पार्टी बांधण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्याशिवाय आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, राजस्थान व छत्तीसगडमध्ये बहुजन समाज पार्टीला वाढविण्यासाठी त्यांनी कठोर परिश्रम घेतले. परंतु १९९८ मध्ये काही वैचारिक मतभेदांमुळे बसपा सोडून स्वतंत्र बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन ही कामगार संघटना व आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टी या राजकीय पक्षांची स्थापना त्यांनी केली आणि हे कार्य त्यांनी आयुष्यभर चालविले. ते हाडाचे पत्रकार होते. सोबतच ते पत्रकारितेतील पदवीधर होते. त्यांनी दैनिक बहुजन टाईम्स व साप्ताहिक बहुजन नायक या बसपाच्या वृत्तपत्रांना अखंडपणे चालवून पत्रकारितेतील सखोल निरीक्षणातून बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आपली लेखणी झिजवली आणि सन १९९८ पासून इंग्रजी व मराठी भाषेतील शालवन पत्रिका या वृत्तपत्राचे त्यांच्या पश्चात त्यांच्या सहचारिणी मा. निर्मलाबाई उबाळे या वृत्तपत्र चालवित आहेत. समाज प्रबोधनाचा धगधगता अग्नी त्यांनी आपल्या आयुष्यात कधीही विझू दिला नाही. प्रत्येक आघाडीवर संघर्ष आणि संघर्ष हे त्यांचे ब्रिद वाक्य होते. बहुजन समाजाच्या पायाभरणी करीता रक्ताचा थेंब न थेंब आटवणाऱ्या उबाळे साहेबांनी इतर मागासवर्गीयांसाठी व त्यांना सन्मान व न्यायाची संधी मिळवून देण्याकरिता धडपडणारा हा बहुजनाचा नेता मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासाठी भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री व्ही. पी. सिंग यांचेकडे केलेला पाठपुरावा हा देशवासीयांच्या मनात कायम लक्षात राहील. त्यांनी आपल्या हयातभर गरीब, शेतकरी, शेतमजूर, कामगार, अल्पसंख्यांक, आदिवासी, कष्टकरी समाजासाठी व त्यांच्या उन्नतीसाठी भरीव कार्य केले. त्यांनी तिवसा परीसरातील समविचारी कार्यकर्ते सोबत घेऊन गरीब व गरजू शेतकऱ्यांसाठी स्वतःच्या मालकीची शेती विकून साखर कारखाना उभारण्याकरीता केलेली धडपड कायम लक्षात राहण्यासारखी आहे. त्यांचे मोलाचे व्याख्यान ऐकण्यासाठी खेड्यापाड्यातील कार्यकर्ते बहूसंख्येने उपस्थित राहायचे. सर्वसामान्य माणसांचा पुढारी व लोकनेते म्हणून त्यांची ओळख होती. घरादारावर तुळशीपत्र ठेवून भारतभर भ्रमण करणारा आणि आहे त्या बिकट परिस्थितीत समाधान मानणारा उत्तुंग उंचीचा माणूस आजघडीला आमच्यात नाही, ही उणीव न भरून निघणारी आहे. विशेष म्हणजे बहुजन समाज पार्टी मध्ये काम करणाऱ्या अनेक पुर्णवेळ कार्यकर्त्यांनी समाजकार्यासाठी वाहून घेता यावे यासाठी आजन्म अविवाहित राहणे पसंत केले. तर काहींनी विवाह करून सुद्धा अपत्ये जन्माला घातले नाहीत, त्यामध्ये सर्वोच्च त्याग करणाऱ्या पैकी श्रीकृष्ण उबाळे साहेब यांचा नामोल्लेख करावा लागेल. त्यांच्या पश्चात आंबेडकरी चळवळीला गतीमान करण्याकरीता त्यांच्या पत्नी निर्मलाताई उबाळे अग्रेसर आहेत, त्यांचा निश्चितच अभिमान वाटतो. कालकथित श्रीकृष्ण उबाळे साहेब हे निष्ठावंत आणि हाडाचे कार्यकर्ते असल्याने ते सातत्याने पक्ष तसेच बहुजन एम्प्लॉइज फेडरेशनच्या कार्यात व्यस्त असायचे त्यामुळे स्वतःच्या आरोग्यावर त्यांचे दुर्लक्ष व्हायचे, त्यामुळे त्यांना १९९५ मध्ये पहिला हृदय विकाराचा झटका आला, परंतु त्याला सुद्धा न जुमानता त्यांनी आपले दैनंदिन जनहिताचे कार्य सुरूच ठेवले होते, अशातच ८ ऑगस्ट २०१६ रोजी त्यांना दुसरा हृदय विकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांनी आखरी श्वास घेतला.त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.●●



रतन तायडे
94201 25761




# स्वस्थ राहा, मस्त राहा!!

'स्वतंत्र राहा, मस्त राहा' हे चार शब्द केवळ घोषवाक्य नाहीत, तर आनंदी आणि समाधानकारक जीवनाचा मूलमंत्र आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस अपेक्षा, स्पर्धा, पैसा, ताणतणाव आणि सोशल मीडियावरील तुलनेत अडकून पडला आहे. अशा वेळी खरा आनंद मिळवायचा असेल तर विचारांनी, कृतीने आणि मनाने स्वतंत्र राहणे आवश्यक आहे. मन स्वतंत्र असेल तरच जीवन मस्त जगता येते. मस्त राहणे म्हणजे बेफिकीर होणे नव्हे, तर सजग, आनंदी आणि आपल्या कामात मनापासून रमणे होय.

स्वतंत्र राहणे म्हणजे सर्वप्रथम विचारांचे स्वातंत्र्य. 'लोक काय म्हणतील?' या भीतीत अनेक जण स्वतःची स्वप्नेच विसरतात. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार आणि आवडीनुसार निर्णय घ्यावेत. जीवन आपले आहे, त्यामुळे त्याचा मार्गही आपणच ठरवायला हवा.

भावनिक स्वातंत्र्यही तितकेच महत्त्वाचे आहे. इतरांच्या स्तुतीने हुरळून जाऊ नये आणि टीकेने खचूनही जाऊ नये. सुख-दुःख, मान-अपमान यांचा समतोल स्वीकारता आला तर मन शांत राहते. भगवान बुद्धांनी आसक्ती हे दुःखाचे मूळ असल्याचे सांगितले आहे. म्हणून नाती जपा, पण त्यात स्वतःला हरवू नका.

आर्थिक स्वातंत्र्य जीवनाला आत्मविश्वास देते. पैसा सर्वस्व नसला तरी स्वतःच्या गरजांसाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागू नये. नोकरी, व्यवसाय किंवा इतर कोणतेही प्रामाणिक उत्पन्नाचे साधन माणसाला मानसिक बळ देते.

मस्त राहण्यासाठी निरोगी शरीर, शांत मन आणि अर्थपूर्ण काम आवश्यक आहे. नियमित चालणे, व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप यामुळे शरीर तंदुरुस्त राहते. त्याचबरोबर दररोज काही मिनिटे ध्यान, श्वासावर लक्ष केंद्रित करणे आणि सकारात्मक विचार यामुळे मन प्रसन्न राहते. नकारात्मक वातावरणापासून शक्य तितके दूर राहून कृतज्ञतेची भावना जोपासली पाहिजे. काम हे केवळ उपजीविकेचे साधन नसून समाजसेवेचे माध्यमही असू शकते. आपल्या कामातून कोणाचा तरी उपयोग होत आहे, ही भावना कामाला अर्थ देते. उद्देशपूर्ण काम करणारा माणूस नेहमी उत्साही राहतो. आनंदी जीवनासाठी काही सोपे नियम लक्षात ठेवावेत. स्वतःची तुलना इतरांशी करू नका. प्रत्येकाचा प्रवास वेगळा असतो. गरज पडेल तेव्हा 'नाही' म्हणायला शिका. आपल्या वेळेची आणि ऊर्जेची किंमत ओळखा. दररोज एखादा छोटा आनंद शोधा, मित्रांशी गप्पा, चहाचा कप, एखादे पुस्तक किंवा झाडांची काळजी. शरीर आणि मनाची नियमित काळजी घ्या. नवीन गोष्टी शिकत राहा, कारण शिकण्यामुळे विचार ताजे राहतात. शक्य तेव्हा इतरांना मदत करा; मदतीतून मिळणारा आनंद वेगळाच असतो. तसेच भूतकाळाचा पश्चात्ताप आणि भविष्याची चिंता यांमध्ये न अडकता वर्तमानात जगण्याचा प्रयत्न करा.

जीवनात अडचणी येणारच. अशावेळी घाईघाईने निर्णय घेण्याऐवजी शांतपणे परिस्थितीचा विचार करा. समस्या लिहून काढा, मित्र किंवा कुटुंबीयांशी चर्चा करा आणि योग्य उपाय शोधा. जे बदलता येणार नाही ते स्वीकारा, पण जे बदलता येईल त्यासाठी नक्की प्रयत्न करा. समुद्रातील लाटांप्रमाणे संकटे येतात; त्यांच्याशी लढण्यापेक्षा त्यांना समर्थपणे सामोरे जाणे महत्त्वाचे असते. मित्र, कुटुंब आणि समाज यांच्यासोबतचे जिव्हाळ्याचे संबंध जीवन अधिक सुंदर बनवतात. एकमेकांच्या आनंदात सहभागी व्हा, अडचणीत धावून जा आणि यशाचे कौतुक करा. आनंद वाटल्याने तो वाढतो आणि दुःख वाटल्याने ते कमी होते. शेवटी एवढेच, आयुष्य खूप मौल्यवान आहे. स्वतःचे निर्णय स्वतः घ्या, निरोगी राहा, प्रामाणिकपणे काम करा आणि प्रत्येक दिवस आनंदाने जगा. आपण स्वतः आनंदी असलो तर आपल्या कुटुंबात, मित्रपरिवारात आणि समाजातही सकारात्मकता निर्माण होते. संकल्प करू या - स्वतंत्र राहू, स्वस्थ राहू आणि मस्त राहू. हाच आनंदी, यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवनाचा खरा मार्ग आहे.●●



सुकुशल य ना पाटील
मो. 7499188 523

## त्सुनामी

भिजलो पावसात कितीही तरी
मन माझे पावसाळी होत नाही
पार रक्ताळल्यात काळजावरच्या जखमा
मनाला माझ्या आता ओल येत नाही!

फाटक्या आभाळात जरी हे देह जन्मले
फुटक्या पाटीवर मी जीवनाक्षरे लिहिले
उसनी छत्री माझ्या काय कामाची?
जखमांचे महापूर नाही कधी ओसरले!

बुडत्याला नेमाने हात देत गेलो
काळजाच्या नावेत जागा देत गेलो
नावेच्या मनाला आता समजावू कसा?
फितुरांनाच मी जीवाभावाचे मानत गेलो!

गर्जून आल्या कितीही वेदना
माणूसकी मी सोडत नाही
दारावरची अनोळखी हाक ऐकून
चांगुलपणा पाठ फिरवत नाही !

जखमांचे ओझे नाही वाटत मला
वेदनांनीच माझा सांभाळ केला आहे
वादळवारा पाऊस काय करतील माझे ?
आयुष्याला त्सुनामीची झाली सवय आहे !!!

- डॉ.महेंद्रकुमार मेश्राम

## सनदी अधिकाऱ्यांपासुन अपेक्षा

अन्न व औषध प्रशासन खाते शासनाचे
पहील्यांदाच समजले अस्तित्व त्याचे

व्यापाऱ्यांनी नफेकरीता केलेले उपक्रम
लावत आहे एक सनदी अधिकारी उधळुन

तीस वर्षांने मुख्य निवडणूक आयुक्तानंतर
पाहीला सनदी अधिकाऱ्याचा धमक व जोर

राजकारण्याची फक्त सत्तेसाठी धावपळ
लोकांची सेवा करतो हे निव्वळ मृगजळ

सामान्य जनतेचे नाही करत कोणी रक्षण
त्यामुळे सनदी अधिकारी आहे आशेचे स्थान

माजी निवडणुक आयुक्तानी इतिहास रचला
राजकारण्यांनाही लावले घुटने टेकायला

सनदी अधिकाऱ्यांकडून आहे हीच अपेक्षा
फक्त शोधावी लागते प्रवाहाच्या विरुद्ध दिशा

संविधानाने दिले समग्र संरक्षण आपणास
लोकांची अपेक्षा पूर्ण करावी घडवून इतिहास

- इंजि .नरेंद्र ताकसांडे



## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

बहुजन सौरभ

## शोध

मी क्षणिक दिसले नाही, तू आकाश तुडविले होते,
अरे, मी कुठे हरवली होती, तू कुठे शोधले होते||

मी तुझी परीक्षा घ्याया दूर तुजपासून गेले,
विरहात नाव तू माझे, कुठे कुठे कोरले होते ||

तू शोधून शोधून मजला, ज्या क्षणी उर दाटूनी आला,
माझेही श्वास हे सखया, श्वासाशी धडकले होते||

तू माझ्यासाठी दु:खाला कां इथवर पचवित आला,
सांग माझ्यासंगे सुखाचे, तू दान भोगले होते ||

मी कधीही नव्हती तुझी, तू कधीही नव्हता माझा,
मीच हेच समजुनी, माझे घरदार बसवले होते ||

- मिलिंद खैरकर

## मन

डोळ्यांची भाषा मनाची व्यथा व्यक्त करते,
मनीचे मुके बोल अलगद बोलू लागते.
भूतकाळात मन पुन्हा पुन्हा झुलते,
विसरायचे तेच पुढे दृष्टीपटलावर येते... ॥१॥

वर्तमानात मन कधी थांबत नाही,
जेथे जेथे जाते, तेथेच रेंगाळून राही.
भूतकाळ आठवून वर्तमान खराब होई,
विसरायचे तेच मनात पुन्हा पुन्हा येई... ॥२॥

लोभ-लालसेचा मनावर मोठा बोजा आहे,
मन मैलाने भरलेले,
शरीर मात्र गंगेत धुतले आहे.
चेहऱ्यावर हास्य, अंतरी लोभ आणि
द्वेष आहे, डोळे बंद असले तरी
आरशासमोर मनच उभे आहे... ॥३॥

- इंजि. शुद्धोधन बडवणे



## !! नामांतर !!

बाबा तुझ्या नावांसाठी रक्ताचे पाणी केले,
लढलो कटलो जळलो तेव्हा नाम विस्तार झाले.

27 जुलै 1978 ला शासनाने ठराव मंजूर केला,
जातिवाद्यांना पचले नाही द्वेषाचा वणवा पेटला,
मिलिंद पोटी जन्मले विद्यापीठ नाव दुजाचे कसले,
लढलो कटलो जळलो तेव्हा नाम विस्तार झाले.

अत्याचाराच्या ज्वालात महारवाडा जळत होता,
हात छाटले तरी पोचीराम जयभीम म्हणत होता.
सूडाच्या आगीने चंदरही गेला बाप-बेटे अमर झाले,
लढलो कटलो जळलो तेव्हा नाम विस्तार झाले.

नागपुरात निषेधमोर्चा 4 ऑगस्ट1978 ला निघाला
इंदोरा पुलावर निर्दयतेने पोलिस गोळीबार झाला,
रनामांतर झालेच पाहिजेर म्हणत पाच शहिद झाले
लढलो कटलो जळलो तेव्हा नाम विस्तार झाले

स्वाभिमानी जपली अस्मिता कदापी झुकले नाही,
बाबा, लढलो सोळा वर्षे पण तुला गमावले नाही
घरटे तूटले, आपले सुटले संसार तार तार झाले.
लढलो कटलो जळलो तेव्हा नाम विस्तार झाले.

-चित्तरंजन चौरे

## वर्षावास

गुरू पौर्णिमेस करू
बौद्ध धर्म वर्षवास
पंचशील पाळा गृही
अष्टशील होती खास
वर्षा म्हणजे पाऊस
वास अर्थात निवास
सूक्ष्म जंतू नको इजा
आध्यात्मिक उपवास
व्हावे अहिंसा पालन
बौद्ध भिक्षू लावी ध्यान
धम्म प्रसार स्वाध्याय
विपश्यना अध्ययन
उपोसथ संयमाने
धम्मदान सेवा मान
द्यावे भिक्कूंना चिवर
अन्न औषधांचे दान
बुद्धविहारात जाऊ
प्रवचन ऐकू छान
तीन मासाचे उपास
काढे शरीराची घाण
चला धम्म सारे गाऊ
बुद्ध वंदना विहारी
ग्रंथ वाचन श्रवण
आत्मपरीक्षण तारी
राग लोभ द्वेष फेका
नको खोटा अहंकार
सजीवाला लावा जीव
वाजे स्वानंदी झंकार

-डॉ. शील बागडे

## लिव इन

लिव इन मधे तो/ती असते
पण मुल नक्की कुणाचे असते
जरी ते दत्तक असले तरी
चार चौघात मिरवायचे असते

कुणा कडून किती घ्यायचे
कुणा किती द्यायचे असते
घर कसे कसे चालवायचे
हे फक्त तिलाच ठाउक असते

आमचे सगळे ठीक आहे
हे वरवर सांगायचे असते
दिवसाच कडाक्याचे भांडण
मध्यरात्रि मिटवायचे असते

लाख फुशारक्या मारल्या तरी
त्याचे तारुण्य ती जोखत असते
तो किती किती पावरफुल आहे
हे फक्त बाइच मोजत असते

- दिवाकर शिर्के



## नका माय बापा

दगा पालकांशी,
छुपा वार आहे असा जन्म अमुचा,
भुई भार आहे

नका माय बापा,
कुणी त्रास देऊ मुले दूर असता,
मुका मार आहे

नका ऊर बडवू,
मरण सत्य आहे जगी जीवनाचा,
खरा सार आहे

किती बंद ठेवा,
तुम्ही काळजाला तरी प्राण जातो,
खुले दार आहे

इथे तोच तरतो,
जया राजगादी असा कोण ज्याला,
जनाधार आहे

कितीही असेना,
धनाचा पहारा तरी दु:ख, चिंता,
नि आजार आहे

अकेलाच आना,
अकेलाच जाना कुणी सोबतीला,
न येणार आहे

मने शुद्ध जेथे,
वसे बुद्ध तेथे सुखी तोच येथे,
सदाचार आहे

- अरुण विघ्ने

## चैतन्याचा आषाढ

उन्ह पांघरल्या देही
मिळे सुखाचा गारवा
गात्र पुलकित होई
येता आषाढ शिरवा

चैतन्याच्या पालखीची
निघे घरोघरी वारी
शेतशिवारी दिसते
निसर्गाची जादूगारी

थेंबा-थेंबांनी खुलते
अवनीचे अंतरंग
उभा राहून डोंगरी
पावा वाजवी श्रीरंग

रंग अनंत हर्षाचे
भरले सृष्टी गाभारी
रंग भरतो विधाता
उजळलेल्या संसारी

कृष्णवर्णी देहावर
चढे हिरवा मांडव
पाना-पानात हसते
नवे रेखिले वैभव

घाली सुखाची पाखर
आषाढ चैतन्यदाता
त्याच्या ओलाव्याने मिळे
नवा श्वास जीवजाता

-निशा खापरे

“ अडचणींना घाबरू नका, त्या ताकद वाढवतात... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# हजारो शाळा बंद, ही देशाची अधोगती

देशभरातील सरकारी शाळांची संख्या कमी होत असताना शिक्षणव्यवस्थेसमोर गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. हजारो शाळा बंद होणे, सुमारे एक लाख शाळा एकशिक्षकी असणे आणि मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण करू न शकणे, ही केवळ शिक्षण क्षेत्राची समस्या नाही; ती देशाच्या सामाजिक आणि आर्थिक भवितव्याची चिंता आहे. सरकारी शाळा या गरीब, शेतकरी, मजूर, कष्टकरी आणि वंचित कुटुंबांच्या मुलांसाठी शिक्षणाचे सर्वात मोठे माध्यम आहेत. या शाळा बंद झाल्या किंवा गावापासून दूर गेल्या तर त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण विद्यार्थ्यांना बसतो. खासगी शाळांची संख्या वाढत असली तरी प्रत्येक कुटुंबाला त्याचा खर्च परवडतोच असे नाही. परिणामी अनेक मुले शिक्षण सोडून रोजगार, मजुरी किंवा घरगुती कामांकडे वळण्याची शक्यता वाढते. एकशिक्षकी शाळा हा देखील गंभीर प्रश्न आहे. एका शिक्षकावर अनेक वर्ग, अनेक विषय आणि प्रशासकीय कामांची जबाबदारी सोपवली गेली तर विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे कठीण होते. शिक्षकांची संख्या वाढविण्याऐवजी शाळांचे विलिनीकरण किंवा बंद करण्याचा मार्ग स्वीकारणे हा समस्येवरील कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. बारावीपर्यंत मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पोहोचत नसतील, तर त्यामागील कारणे शोधणे आवश्यक आहे. आर्थिक परिस्थिती, शाळेचे अंतर, पालकांचे स्थलांतर, बालमजुरी, शिक्षणाचा वाढता खर्च आणि शाळांमधील अपुऱ्या सुविधा यांचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना केवळ शाळेत दाखल करणे पुरेसे नाही; त्यांचे शिक्षण सातत्याने सुरू राहील आणि ते माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत पोहोचतील, यासाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर, कमी होत असलेले जन्मदर आणि पालकांचा खासगी शाळांकडे वाढलेला कल यामुळे अनेक गावांतील सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प राहिली आहे. काही ठिकाणी एका वर्गात दोन-तीन विद्यार्थी किंवा संपूर्ण शाळेत दहा-पंधरा विद्यार्थी असतात. त्यामुळे प्रशासन अशा शाळा जवळच्या मोठ्या शाळांमध्ये विलीन करण्याचा निर्णय घेत आहे. विद्यार्थ्यांची संख्या कमी असण्यामागची कारणे समजून घेऊन त्या शाळा सक्षम करण्याचा प्रयत्न होणे अधिक महत्त्वाचे आहे. खासगी शिक्षणाचा वाढता प्रभाव हेही सरकारी शाळांमधील घटत्या पटसंख्येचे एक महत्त्वाचे कारण आहे. इंग्रजी माध्यम, आधुनिक सुविधा, डिजिटल शिक्षण आणि चांगल्या निकालांच्या अपेक्षेमुळे अनेक पालक खासगी शाळांना प्राधान्य देतात. अनेकदा आर्थिक




अडचणी असूनही पालक कर्ज काढून किंवा इतर खर्च कमी करून मुलांना खासगी शाळेत प्रवेश देतात. परिणामी सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या आणखी कमी होते. सरकारी शाळांतील पायाभूत सुविधांचा अभाव ही गंभीर समस्या आहे. अनेक शाळांमध्ये पुरेशा वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी किंवा खेळाची मैदाने उपलब्ध नसतात. काही शाळांच्या इमारती जीर्ण अवस्थेत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थी आणि पालकांचा सरकारी शाळांवरील विश्वास कमी होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे शाळांमध्ये आधुनिक आणि सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शिक्षकांची कमतरता आणि रिक्त पदे हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे शिक्षक भरती होत नाही. एका शिक्षकावर अनेक वर्गांची जबाबदारी येते. त्यात निवडणुका, जनगणना आणि विविध शासकीय मोहिमांसारखी प्रशासकीय कामे शिक्षकांवर सोपवली जातात. परिणामी अध्यापनासाठी मिळणारा वेळ कमी होतो आणि शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. त्यामुळे पुरेशा शिक्षकांची नियुक्ती करून त्यांना अध्यापनावर लक्ष केंद्रित करण्याची संधी देणे गरजेचे आहे. कमी पटसंख्येमुळे शाळांचे एकत्रीकरण करण्याचे धोरण काही ठिकाणी राबविले जात आहे. खर्च कमी करणे आणि चांगल्या सुविधा एका मोठ्या शाळेत उपलब्ध करून देणे हा त्यामागचा उद्देश सांगितला जातो. मात्र ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना दररोज लांब अंतर प्रवास करावा लागल्यास त्याचा शिक्षणावर विपरीत परिणाम होऊ शकतो. विशेषतः लहान मुले आणि मुली यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे शाळांचे विलिनीकरण करताना विद्यार्थ्यांचे अंतर, वाहतूक आणि सुरक्षितता या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. सामाजिक आणि आर्थिक विषमताही सरकारी शाळांच्या स्थितीवर परिणाम करते. गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करावे लागते. बालमजुरी, स्थलांतरित मजूर कुटुंबे आणि आर्थिक अस्थिरता यामुळे काही मुले शाळेबाहेर राहतात. त्यामुळे सरकारी शाळांमधील पटसंख्या घटते आणि शिक्षणातील असमानता वाढण्याचा धोका निर्माण होतो. कोविड-१९ नंतर शिक्षणव्यवस्थेत मोठे बदल झाले. अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित झाले आणि काही विद्यार्थी पुन्हा शाळेत परतले नाहीत. डिजिटल शिक्षणाची दरीही प्रकर्षाने जाणवली. ग्रामीण आणि गरीब विद्यार्थ्यांना मोबाईल, संगणक किंवा इंटरनेटसारखी साधने उपलब्ध नसल्याने त्यांच्या शिक्षणाचे मोठे नुकसान झाले. या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. सरकारी शाळा बंद होणे हा केवळ शिक्षणाचा प्रश्न नाही, तर सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. सरकारी शाळा कमी झाल्यास गरीब आणि वंचित समाजातील मुलांच्या शिक्षणाच्या संधी मर्यादित होऊ शकतात. शिक्षणातील असमानता वाढू शकते. म्हणून सरकारी शाळा सक्षम करणे, शिक्षकांची भरती करणे, आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि पालकांचा विश्वास पुन्हा संपादन करणे आवश्यक आहे.



विलास गजभिये
मो. 9421588901

सरकारने शिक्षणाकडे केवळ खर्च म्हणून न पाहता देशाच्या भविष्यातील गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. कमी पटसंख्या असलेल्या शाळा तातडीने बंद करण्याऐवजी त्यांची कारणे शोधली पाहिजेत. ज्या गावांमध्ये विद्यार्थी कमी आहेत, तेथे शाळा टिकवण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे. गरीब आणि वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर जावे लागू नये, यासाठी सरकारी शाळांना आर्थिक, शैक्षणिक आणि पायाभूत आधार देणे ही सरकारची जबाबदारी आहे. शाळा वाचविणे म्हणजे केवळ इमारत वाचविणे नाही; तर एका पिढीचे भविष्य वाचविणे आहे. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली राहिली पाहिजेत. सरकारी शाळा मजबूत झाल्या तरच सर्वसामान्यांच्या मुलांना समान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळेल. त्यामुळे शाळा बंद करण्यापेक्षा त्या अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविणे हीच काळाची गरज आहे.●●

# विश्वासावर केलेली सही आणि माझी पहिली साक्ष

अनेकदा एखादे काम करताना कुणाला तरी साक्षी ठेवले जाते. तर अनेक वेळा अगदी सहजपणे, विश्वासाच्या नात्याने किंवा कामाचा भाग म्हणून एखाद्या जवळच्या व्यक्तीकडून कागदावर सही करून घेतली जाते. आपणही कोणताही विचार न करता सही करून मोकळे होतो आणि काही दिवसांनी ती बाब पूर्णपणे विसरून जातो. परंतु तीच सही एक दिवस न्यायालयाच्या साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभी करते, तेव्हा नकळत झालेल्या चुकीची जाणीव आणि पश्चात्ताप झाल्याशिवाय राहत नाही. जीवनातही असेच अनेक प्रसंग घडतात. मुस्लिम विवाहात मौलवी, नातेवाईक आणि स्नेही यांच्या उपस्थितीत वराची सही घेतली जाते, तर वधूकडून ‘कबूल आहे’ असे म्हणत कबूलनामा करून घेतला जातो. त्या विवाहाचे दोन साक्षीदार असतात आणि त्यांच्या साक्षीवर संसाराची सुरुवात होते. पुढे आयुष्याच्या प्रवासात ते साक्षीदार कुठे गेले, हेही आठवत नाही. हिंदू विवाहातही मंगलाष्टके म्हणणारे भटजी, अंतरपाट धरणारे आणि अक्षता टाकणारे नातेवाईक त्या मंगलक्षणाचे साक्षीदार असतात; पण अपवाद वगळता त्यांची पुन्हा भेट होईलच, असे नाही. सन १९९४ मध्ये जळगाव येथे पाच वर्षे नोकरी केल्यानंतर माझी बदली नाशिक येथे झाली आणि मी 'लोकमत'मध्ये शहर वार्ताहर म्हणून रुजू झालो. शालिमार चौकातील सुमंगल कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या शिवसेनेच्या जिल्हा कार्यालयालगत आमचे कार्यालय होते. राहण्यासाठी घर किंवा खोली मिळेपर्यंत माझा मुक्काम कार्यालयातच असायचा. त्यावेळी राजाभाऊ गोडसे हे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख, तर विनायक पांडे शहरप्रमुख होते. लोकमतचे मुख्य कार्यालय नागपूर येथे होते. जळगाव आणि नाशिकचा कारभारही नागपूरहूनच पाहिला जात असे. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे हे त्यावेळी संपादक होते. त्यांची माझी प्रत्यक्ष भेटही झाली नव्हती; तरी त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवून शहर वार्ताहर म्हणून संधी दिली. स्पर्धक वृत्तपत्रे स्थानिक असल्याने त्यांच्याकडे रात्री उशिरापर्यंत बातम्या घेतल्या जात. मात्र आमची डेडलाईन रात्री साडेआठ वाजेपर्यंत असल्याने दिवसभरातील सर्व बातम्या त्या वेळेत टेलिप्रिंटरवर पाठवाव्या लागत. नंतर संगणकावरील मोडेमद्वारे मजकूर नागपूरला पाठवला जात असे. सकाळी कार्यालयात आल्यानंतर दुपारी तीनपर्यंत जिल्हाभरातील वार्ताहरांकडून आलेल्या बातम्या संपादित करून आम्ही पाठवत असू. त्यानंतर शहरातील वृत्तसंकलनासाठी बाहेर पडायचो. माझ्याकडे जिल्हा परिषद, जिल्हा सामान्य रुग्णालय, न्यायालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय या विभागांची जबाबदारी होती. जिल्हा परिषदेतून वृत्तसंकलन केल्यानंतर जिल्हा रुग्णालयात जाणे हा माझा रोजचाच दिनक्रम होता. जिल्ह्यात कुठेही गंभीर अपघात झाला की जखमींना प्रथम जिल्हा रुग्णालयात आणले जाई. त्यामुळे तेथील डॉक्टर, परिचारिका आणि पोलीस कर्मचाऱ्यांशी ओळख झाली होती आणि वृत्तसंकलनासाठी त्यांची चांगली मदत मिळत असे. १९९५ च्या सुमारास तेथे एक पोलीस कर्मचारी होता. तो रोजची डायरी दाखवून नोंद झालेल्या घटनांची माहिती देत असे. पत्रकार आणि पोलिसांचे संबंध परस्परपूरक असतात. दोघेही एकमेकांना सहकार्य करत असतात.




एके दिवशी जिल्हा रुग्णालयात एका महिलेचा भाजून मृत्यू झाला होता. त्या पोलिसाने मला बोलावून, ‘इथे सही करा, काही विशेष नाही,’ असे सांगितले आणि मृत महिलेच्या शवविच्छेदन (पोस्टमार्टेम) अहवालावर माझी सही करून घेतली. तो प्रकार मी पूर्णपणे विसरून गेलो. मात्र त्या महिलेच्या मृत्यूबाबत नातेवाईकांनी संशय व्यक्त केल्याने प्रकरण न्यायालयात गेले. साधारण महिनाभरानंतर अचानक माझ्या कार्यालयात पोलीस न्यायालयाचे समन्स घेऊन आला आणि मला न्यायालयात साक्षीसाठी हजर राहण्यास सांगितले. अर्थातच तो माझ्या आयुष्यातील पहिलाच प्रसंग होता. साहजिकच पोटात गोळा आला. मी घाबरतच त्या प्रकरणाशी संबंधित पोलिसांशी संपर्क साधला. त्यांनी संबंधित वकिलाला भेटण्याचा सल्ला दिला. मी तातडीने वकिलांना भेटलो. त्यांनी मला धीर देत सांगितले, ‘घाबरू नका. हा किरकोळ प्रकार आहे. मी सर्व सांभाळतो. तुम्ही फक्त न्यायालयात हजर राहा आणि मी विचारलेल्या प्रश्नांना योग्य ती उत्तरे द्या.’ त्यांनी माझी छोटीशी तयारी करून घेतली. दुसऱ्या दिवशी मी न्यायालयात हजर झालो. वकिलांनी संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थित हाताळली. मी फक्त ‘हो’ आणि ‘नाही’ एवढीच उत्तरे दिली आणि माझी साक्ष पूर्ण झाली. त्यानंतर न्यायालयात साक्षीसाठी उपस्थित राहिल्याबद्दलचा एक फॉर्म भरून घेतला गेला. त्या काळी साक्षीदारांना न्यायालयाकडून भत्ता दिला जात असे आणि मलाही तो भत्ता मिळाला. वृत्तपत्रात काम करताना विविध पक्ष, संघटना आणि संस्थांची प्रसिद्धीपत्रके येत असत. त्यामध्ये अनेकदा आरोप-प्रत्यारोप असत. दोन्ही बाजू समजून घेतल्यानंतरच वृत्त प्रकाशित करावे लागे. अशाच एका कामगार संघटनेच्या नेत्याने दिलेली बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर पुन्हा एकदा न्यायालयात साक्षीसाठी उभे राहण्याची वेळ आली. त्या वेळीही संबंधित वकिलांनी आवश्यक तेवढीच साक्ष घेऊन मला मुक्त केले. यानंतर वृत्तपत्रातील नोकरीमुळे अनेक वेळा न्यायालयात दैनिकाच्या वतीने हजेरी लावणे, पुढील तारखा घेणे अशी कामे केली. मात्र विश्वासाने केलेली सही आणि त्यातून साक्षीदार म्हणून न्यायालयात उभे राहण्याचा पहिला अनुभव आयुष्यभर विसरता येणार नाही.●●



शफीक शेख
मो. 9420588366

# रेखा : त्याग, समर्पण आणि कृतज्ञतेचा जिवंत दस्तऐवज

## काळजावर कोरलेली अक्षराकृती

काही पुस्तके केवळ कागदावर छापलेले शब्द नसतात, तर ती काळजावर कोरलेली अक्षरे असतात. वाचन संपल्यानंतरही ती वाचकाच्या अंतःकरणात विचारांचे तरंग निर्माण करत राहतात. काही व्यक्ती इतिहास घडवणाऱ्या नायकाच्या पाठीशी अधिष्ठान बनून शांतपणे उभ्या राहतात. माजी सनदी अधिकारी ई. झेड. खोब्रागडे यांनी आपल्या जीवनसंगिनीविषयी कृतज्ञतेने आणि आर्द्रतेने साकारलेली ‘रेखा’ ही अशाच एका उत्तुंग सहजीवनाचा जीवनस्पर्शी आलेख आहे. ‘रेखा’ म्हणजे मूल्यांचे अधिष्ठान, प्रेमाचे समर्पण आणि लोकसेवेचा जिवंत ध्यास. हा केवळ एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याचा आत्मवृत्तांत किंवा एका दाम्पत्याची कौटुंबिक कहाणी नाही; तर निष्ठा, त्याग, नैतिक स्वाभिमान आणि लोकसेवेच्या एकात्म ध्यासाचा सजीव दस्तऐवज आहे. रेखा खोब्रागडे यांच्या त्याग, समर्पण आणि निरपेक्ष प्रेमाचे हे भावपूर्ण चित्रण आहे. प्रेरणेचा उगम आणि जीवनप्रवास १५ ऑगस्ट २०१५ रोजी ‘आणखी एक पाऊल’ या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात रेखाजींनी व्यक्त केलेले मनोगत उपस्थितांच्या मनाला भिडले. आणि त्यातून ‘रेखा’ या अक्षराकृतीचा जन्म झाला. जून १९५९ रोजी जन्मलेल्या रेखाजींना समृद्ध कौटुंबिक संस्कार लाभले. त्यांचे वडील जगन्नाथ कांबळे हे रेल्वेत अधिकारी होते. मुंबईतील पुरोगामी विचारांचे केंद्र असलेल्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये त्यांचे उच्चशिक्षण झाले. या काळात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वैचारिक प्रगल्भता लाभली. उच्चपदस्थ सनदी अधिकाऱ्याची पत्नी असूनही त्यांनी कधीही अहंगंड किंवा बडेजाव बाळगला नाही. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हा त्यांच्या जीवनाचा आधार होता. खोब्रागडे साहेबांच्या प्रशासकीय आणि सामाजिक कार्यात त्या कायम खंबीरपणे पाठीशी उभ्या राहिल्या. ‘संविधान फाउंडेशन’च्या स्थापनेत आणि विस्तारातही त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले. रेखाजींच्या विचारविश्वावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बुद्ध धम्म तसेच माता जिजाऊ, सावित्रीमाई, रमाई आणि यशोधरा यांच्या विचारांचा प्रभाव होता. याच मूल्यांच्या आधारावर त्यांनी नेहा, क्रांती आणि नमा या तिन्ही कन्यांचे सुसंस्कारित संगोपन केले. सहजीवनाची प्रगल्भ व्याख्याआपल्या जीवनसखीच्या हयातीतच तिच्या त्यागाची जाणीव ठेवून कृतज्ञता व्यक्त करावी, या उदात्त भावनेतून लेखकाने हे पुस्तक लिहिले आहे. मात्र ‘रेखा’मधील प्रेम व्यक्तीला स्वतःच्या कर्तृत्वासाठी प्रेरणा देणारे आहे. शाळकरी वयात रेखाजींचे दर्शन झाल्यानंतर एकनाथ खोब्रागडे यांच्या मनात रुजलेले प्रेम हे केवळ आकर्षण नव्हते; तर स्वतःला तिच्या योग्यतेचे बनवण्याचा आत्मसंकल्प होता. दीर्घ आणि संयमी प्रवासातून हे प्रेम अधिक प्रगल्भ होत गेले. येथे प्रेमाचा उत्सव दिखाव्यात नसून परस्परांच्या आत्मसन्मानाला दिलेल्या शांत आणि दृढ पाठिंब्यात आहे. कर्तृत्वामागची शांत शक्ती “प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते” हे वाक्य ‘रेखा’मध्ये वास्तव बनून समोर येते. रेखाजी केवळ पतीच्या सुख-दुःखाच्या सोबती नव्हत्या, तर त्यांच्या विचारांच्या प्रहरी, संकटातील नैतिक धैर्याचा आधार आणि विवेकाची मशाल होत्या. प्रशासकीय सेवेत मिळवलेले यश, आदिवासी भागातील लोकाभिमुख कार्य आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नांच्या मुळाशी त्यांची शांत आणि दृढ उपस्थिती होती.लग्नाच्या वेळी




रेखाजींनी पतीसमोर तीन अटी ठेवल्या - कोणतेही व्यसन करायचे नाही, जनतेसाठी प्रामाणिकपणे काम करायचे आणि भ्रष्टाचाराला कधीही स्पर्श करायचा नाही. या अटी केवळ कौटुंबिक अपेक्षा नव्हत्या, तर एका सनदी अधिकाऱ्याच्या नैतिक जीवनाला मिळालेले भक्कम अधिष्ठान होते. लोकसेवेचे आणि नैतिकतेचे शिखर ग ड चि रो ली ती ल अहेरीसारख्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागात सेवा बजावताना रेखाजींनी कोणतीही तक्रार केली नाही. त्यांनी पतीला कामाचे स्वातंत्र्य दिले आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या. त्यांच्या या मानसिक पाठबळामुळे खोब्रागडे साहेबांचा प्रशासकीय दृष्टिकोन अधिक संवेदनशील आणि लोकाभिमुख झाला. दिवाळीच्या शुभेच्छांच्या निमित्ताने घरात आलेले दहा हजार रुपयांचे पाकीट त्यांनी तात्काळ परत पाठवलेला प्रसंग पुस्तकातील नैतिकतेचा महत्त्वाचा टप्पा आहे. प्रामाणिकपणा केवळ बोलण्यात नसून कृतीतून सिद्ध होतो, हे या प्रसंगातून स्पष्ट होते. तसेच कार्यालयाबाहेर उपाशीपोटी बसलेल्या दोन गरीब माडिया आदिवासींकडे रेखाजींचे लक्ष गेले. “त्यांचे काम झाले का?” या त्यांच्या साध्या प्रश्नातून लोकसेवेतील माणुसकीचे दर्शन घडते. त्यांनी त्या दोघांना घरी बोलावून जेवण दिले. प्रशासन म्हणजे केवळ फाईल्स आणि नियम नसून आशेने आलेल्या माणसांची सेवा आहे, हा संदेश या प्रसंगातून मिळतो. साहित्यिक मूल्य आणि जीवनदर्शन ‘रेखा’ची ताकद कृत्रिम अलंकारांमध्ये नसून अनुभवांच्या प्रामाणिकपणात आहे. आत्मचरित्र, सहजीवनाची गाथा, प्रशासकीय संस्मरणे आणि सामाजिक मूल्यविचार यांचा सुंदर संगम या पुस्तकात आढळतो. प्रत्येक प्रसंग इतका जिवंत आहे की वाचक स्वतः त्या अनुभवांचा साक्षीदार असल्यासारखा वाटतो. आज नाती व्यवहारप्रधान होत असताना आणि यशाची व्याख्या पद, पैसा व अधिकारांपुरती मर्यादित होत असताना ‘रेखा’ वेगळे जीवनमूल्य समोर ठेवते. यशाचा खरा अर्थ जपलेली मूल्ये आहेत; प्रेम म्हणजे एकमेकांच्या ध्येयासाठी केलेले मौन समर्पण आहे; लोकसेवा म्हणजे वंचितांप्रति असलेली नैतिक जबाबदारी आहे आणि संसार म्हणजे दोन व्यक्तींच्या मूल्यव्यवस्थेचे सुंदर ऐक्य आहे. ‘रेखा’ ही एका स्त्रीच्या त्यागाची कथा असली तरी त्यापलीकडे ती भारतीय स्त्रीच्या शांत, अदृश्य आणि अफाट सामर्थ्याची साक्ष आहे. एका प्रामाणिक प्रशासकाला घडविणाऱ्या त्याच्या सहचारिणीच्या योगदानाचे हे कृतज्ञतापूर्ण चित्रण असून, नात्यांतील ओलावा, समर्पण, माणुसकी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणारे प्रभावी जीवनदर्शन आहे.●●



अनलि बारसागडे
मो ९४२०५१०२३९

**ग्रंथ परिचय :- पुस्तकाचे नाव : रेखा**
**लेखक : इ. झेड. खोब्रागडे, भा.प्र.से. (नि.)**
**© रेखा खोब्रागडे (मो. ९९२३७५६९०० | E-mail : ez_khobragade@rediffmail.com)**
**प्रकाशक : संविधान फाउंडेशन / इ. झेड. फाउंडेशन, नागपूर**
**सहयोग राशी : ₹ २००/-**
**ISBN : 978-93-343-8792-6**

# आरक्षण विरोधी आंदोलनाचा स्वर केवळ जेन झी चे आंदोलन नष्ट करण्यासाठी!

आरक्षण, सामाजिक समता आणि राजकीय ध्रुवीकरण. भारतात जातीयवाद, धर्मांधता, अंधश्रद्धा, स्त्री व श्रमिकांचे शोषण, लोकशाहीविरोधी प्रवृत्ती आणि संविधानिक मूल्यांवरील प्रश्न याबाबत सातत्याने चर्चा होत आली आहे. या पार्श्वभूमीवर विविध राजकीय आणि सामाजिक संघटना आपल्या विचारांचा प्रसार करतात. आरक्षण, धर्म, जातव्यवस्था, संविधान, भ्रष्टाचार आणि सामाजिक सुधारणांसारखे विषय अनेकदा सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी येतात. त्यामुळे या विषयांकडे भावनिक दृष्टिकोनाऐवजी ऐतिहासिक आणि संविधानिक संदर्भातून पाहणे आवश्यक आहे. आरक्षणाबाबत समाजात अनेक गैरसमज आढळतात. “आरक्षणामुळे इतरांना नोकऱ्या मिळत नाहीत” असा युक्तिवाद केला जातो; मात्र भारतीय संविधानातील आरक्षणाची संकल्पना ऐतिहासिक सामाजिक आणि शैक्षणिक विषमता दूर करण्याच्या उद्देशाने निर्माण झाली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना समान संधी उपलब्ध करून देणे हा त्यामागील प्रमुख हेतू आहे. त्यामुळे आरक्षणाच्या प्रश्नावर चर्चा करताना त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक वास्तव आणि संविधानिक उद्देश समजून घेणे आवश्यक आहे. मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी झाल्यानंतर देशात आरक्षणाच्या प्रश्नावर मोठे आंदोलन झाले. त्या काळात आरक्षणाच्या स्वरूपाबाबत अनेक गैरसमज निर्माण झाले होते. नंतरच्या काळात विविध सामाजिक समूहांनी स्वतःसाठी आरक्षणाची मागणी करण्यास सुरुवात केली. मराठा, जाट, गुर्जर आणि इतर समाजांच्या आंदोलनांमधून आरक्षणाचा प्रश्न केवळ एका वर्गापुरता मर्यादित राहिलेला नसल्याचे दिसून आले. त्यामुळे आरक्षणावर व्यापक आणि तथ्याधारित चर्चा होणे गरजेचे आहे. १९९१ नंतर आर्थिक उदारीकरण आणि खासगीकरणाच्या प्रक्रियेमुळे सरकारी क्षेत्रातील रोजगाराच्या स्वरूपात बदल झाले. सरकारी कार्यालयांमधील कायमस्वरूपी पदांची संख्या कमी होणे, कंत्राटी पद्धतीचा वाढता वापर आणि अस्थायी रोजगार यामुळे आरक्षणाच्या अंमलबजावणीसमोरही नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे आरक्षणाच्या चर्चेबरोबरच रोजगारनिर्मिती, सरकारी क्षेत्राची क्षमता आणि शिक्षणाच्या संधी यांचाही विचार करणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्था हा या चर्चेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. शाळांची संख्या कमी होणे, एकशिक्षकी शाळा, शिक्षकांची कमतरता, पायाभूत सुविधांचा अभाव आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील वाढती विषमता यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांसमोर आव्हाने निर्माण झाली आहेत. शिक्षणातील असमानता दूर करण्यासाठी सरकारी शाळा मजबूत करणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तरुणांच्या आंदोलनांमध्येही या प्रश्नांचे प्रतिबिंब दिसते. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, बेरोजगारी, शिक्षणाचा खर्च आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण होतो. अशा आंदोलनांकडे केवळ राजकीय संघर्ष म्हणून न पाहता तरुणांच्या




वास्तविक प्रश्नांचे प्रतिनिधित्व म्हणून पाहणे आवश्यक आहे. आंदोलन करताना संविधानिक आणि शांततामय मार्गांचा अवलंब करणे तसेच प्रशासनानेही आंदोलकांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने प्रतिसाद देणे महत्त्वाचे आहे. जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रश्नही याच संदर्भात महत्त्वाचा ठरतो. कोणत्याही आंदोलनाला जात किंवा धर्माच्या आधारावर विभागण्याचा प्रयत्न झाल्यास मूळ सामाजिक प्रश्न बाजूला पडण्याची शक्यता असते. आरक्षणासारख्या प्रश्नावर दलित, ओबीसी, आदिवासी, सवर्ण किंवा इतर कोणत्याही समूहांमध्ये संघर्ष निर्माण होण्याऐवजी सामाजिक न्याय, समान संधी आणि रोजगार या मूलभूत प्रश्नांवर चर्चा होणे आवश्यक आहे. संस्कार, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांची व्याख्याही व्यापक असली पाहिजे. माणूसकी, समानता, सत्य, अहिंसा, परस्पर सन्मान आणि कायद्याचा आदर ही लोकशाही समाजाची मूलभूत मूल्ये आहेत. मतभेद असले तरी विरोधकांविषयी द्वेष, हिंसा, अफवा किंवा वैयक्तिक अवमान यांना सामाजिक संस्कार म्हणता येणार नाही. आजच्या तरुण पिढीसमोर सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमुळे माहितीचा मोठा स्रोत उपलब्ध आहे; मात्र त्याचबरोबर चुकीची माहिती आणि अफवांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे कोणत्याही राजकीय किंवा सामाजिक दाव्याची सत्यता तपासणे, संविधान समजून घेणे आणि इतिहासाचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय लोकशाहीची खरी ताकद विविधतेत असून सामाजिक प्रश्नांचे समाधान संघर्ष वाढवून नव्हे, तर संवाद, संविधानिक मूल्ये आणि समान संधी यांच्या माध्यमातून होऊ शकते. आरक्षण, शिक्षण, रोजगार, जातीय विषमता आणि सामाजिक न्याय या प्रश्नांवर भावनिक ध्रुवीकरणापेक्षा तथ्याधारित सार्वजनिक चर्चा झाली, तर समाजातील गैरसमज कमी होण्यास आणि लोकशाही अधिक मजबूत होण्यास मदत होईल.●●

लेखांक168



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

# बालमनावर तथागतांचे मूल्यसंस्कार रुजविणारा ‘सिद्धार्थाचा हंस’

पुरुषोत्तम संबोधी सर लिखित आणि समता संगर प्रकाशन, नागपूर यांनी १ मे २०२६ रोजी बुद्ध जयंती दिनी प्रकाशित केलेला ‘सिद्धार्थाचा हंस’ हा बालकुमार कवितासंग्रह नुकताच वाचण्यात आला. आंबेडकरी साहित्य परिप्रेक्ष्यात सामाजिक, धम्मप्रचारक आणि राजकीय साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. तसेच दिवसेंदिवस नव्या साहित्याची निर्मिती होताना दिसते. परंतु बुद्ध-फुले-आंबेडकरी वैचारिक बालसाहित्याची अपेक्षित अशी नवनिर्मिती होताना दिसत नाही. अशा निराशाजनक आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या एआय युगात पुरुषोत्तम संबोधी सरांनी बालमनावर तथागतांच्या मूल्यसंस्कारांची शिकवण रुजविण्यासाठी अत्यंत स्तुत्य असा उपक्रम हाती घेत ‘सिद्धार्थाचा हंस’ हा बालकुमार कवितासंग्रह वाचकांसमोर आणला आहे. त्याबद्दल सर्वप्रथम पुरुषोत्तम संबोधी सरांचे मनःपूर्वक अभिनंदन. समष्टीच्या दृष्टीने बालमनावर आंबेडकरी सुसंस्कार रुजविणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने आंबेडकरी सांस्कृतिक क्षेत्रात अकोल्याचे दीनबंधू शेगावकर गुरुजी यांनी ‘धम्मोदय पाठशाळे’च्या माध्यमातून धम्माची शिकवण रुजविण्याचे कार्य केले आहे. त्याचप्रमाणे बालसाहित्याचीही अधिक निर्मिती होणे आवश्यक आहे, असा सूर अलीकडे विविध सभा-संमेलनांतून ऐकायला मिळतो. आज वामनदादा कर्डक, बी. काशीनंद, विठ्ठल उमप, हरेंद्र जाधव, नागोराव पाटणकर, कवी मदन नंदेश्वर यांची सहज, सोप्या भाषेतील आशयगर्भ आणि आशयघन अशी अनेक गीते उपलब्ध आहेत. ती बालमनावर सुसंस्कार करणारी आहेत. मात्र या पहिल्या पिढीतील कवी, साहित्यिक आणि गीतकारांनंतर अपेक्षित प्रमाणात बालसाहित्याची निर्मिती झालेली दिसून येत नाही. ज्या प्रमाणात आंबेडकरी वैचारिक आणि वाङ्मयीन साहित्याची निर्मिती होत आहे, त्या प्रमाणात बालमनावर संस्कार रुजविणारे साहित्य निर्माण होताना दिसत नाही. डिजिटल युगातील इंस्टाग्राम, ट्विटर यांसारख्या माध्यमांनी नवजात शिशूपासून ते आयुष्याच्या उत्तरार्धातील व्यक्तींपर्यंत सर्वांनाच प्रभावित केले आहे. अशा परिस्थितीत मुलांना केवळ मनोरंजन नव्हे, तर विवेक, करुणा, समता आणि माणुसकीची दिशा देणाऱ्या साहित्याची नितांत गरज आहे. कवी पुरुषोत्तम संबोधी सर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे खंदे समर्थक असून विशेषतः समता सैनिक दलाचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. यापूर्वी त्यांचा ‘स्फूर्ती शलाका’ हा बालकवितासंग्रह आणि ‘काषाय फिनिक्स’ हा वैचारिक वाङ्मयीन कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. ‘सिद्धार्थाचा हंस’ या संग्रहाचा केंद्रबिंदू म्हणजे सिद्धार्थ ते तथागत गौतम बुद्ध हा प्रेरणादायी जीवनप्रवास. कवीने आपल्या मनोगतात सिद्धार्थ हा ज्ञानाचा आरंभबिंदू आणि बुद्ध हे त्याचे विकसित रूप असल्याचे अधोरेखित केले आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान अथांग सागरासारखे आहे. त्या तत्त्वज्ञानातील जीवनदृष्टी बालकांना समजेल अशा सोप्या, सहज आणि परिणामकारक भाषेत मांडण्याचा प्रयत्न या संग्रहातून झाला आहे. शब्दांचे अवडंबर न माजवता चित्रांच्या साहाय्याने बालमनापर्यंत बुद्धविचार पोहोचविणे, ही या संग्रहाची लक्षणीय वैशिष्ट्ये आहेत. या बालकुमार कवितासंग्रहात एकूण नऊ कवितांचा समावेश आहे. या कवितांमधून अडीच हजार वर्षांपूर्वीचा सिद्धार्थ ते तथागत गौतम बुद्ध हा जीवनप्रवास मोजक्या शब्दांत उलगडतो. ‘असित मुनी’ या कवितेत सिद्धार्थाच्या जन्मानंतर असितमुनींनी केलेल्या भविष्यवाणीचे सुंदर चित्रण आढळते. सिद्धार्थाच्या रूपातील असामान्य बालकाची ओळख आणि त्याच्या भविष्यातील महान कार्याची चाहूल या प्रसंगातून बालमनाला मिळते. ‘सिद्धार्थ आणि देवदत्त’ या कवितेत हंसाच्या प्रसंगाच्या माध्यमातून करुणा, जीवदया आणि मैत्रीचा संदेश प्रभावीपणे मांडला आहे. “मारणारा श्रेष्ठ की तारणारा श्रेष्ठ?” हा प्रश्न बालमनाला केवळ कथा सांगत नाही, तर योग्य-अयोग्याचा विचार करण्यास प्रवृत्त करतो. जीव घेण्यापेक्षा जीव वाचविणे श्रेष्ठ आहे, ही बुद्धविचारातील मूलभूत जाणीव या कवितेत सहजपणे पोहोचते. ‘कंथक’ या कवितेत सिद्धार्थाच्या गृहत्यागाचा प्रसंग आणि प्रिय अश्व कंथक व सखा छन्न यांच्याशी झालेला वियोग अत्यंत हृदयस्पर्शीपणे मांडला आहे. बालमनापर्यंत पोहोचतात. ‘सुजातेची खीर’ या कवितेत कठोर तपश्चर्येनंतर सिद्धार्थांना मिळालेल्या अन्नाचा प्रसंग येतो. सुजातेकडून मिळालेली खीर स्वीकारल्यानंतर सिद्धार्थांना नवी ऊर्जा प्राप्त झाली. शरीर आणि मन यांचे संतुलन आवश्यक आहे, हा मध्यममार्गाचा महत्त्वपूर्ण संदेश या प्रसंगातून अधोरेखित होतो. या कवितेला चित्रांची जोड असल्यामुळे प्रसंग अधिक जिवंत आणि बालसुलभ बनतो. त्यानंतर सिद्धार्थांना बुद्धत्व प्राप्त होते. जगात दुःख आहे आणि त्या दुःखातून मुक्तीचा मार्ग शोधला पाहिजे, या ध्येयाने त्यांनी आपले संपूर्ण जीवन धम्मप्रसारासाठी वाहिले. त्यांच्या जीवनातील करुणा, मैत्री आणि अहिंसा या मूल्यांचा प्रत्यय पुढील कवितांतून येतो. बुद्धांच्या मेत्ताभावनेसमोर हिंसा आणि क्रौर्य निष्प्रभ ठरते. नालागिरी शांत होतो आणि बुद्धांच्या चरणी लीन होतो. द्वेषावर प्रेमाने, हिंसेवर करुणेने आणि क्रौर्यावर मैत्रीभावाने विजय मिळविता येतो, हा संदेश बालमनावर प्रभावीपणे उमटतो. संग्रहातील नववी कविता ‘अंगुलीमाल’ परिवर्तनाची प्रेरणादायी कथा सांगते. अमानुष कृत्ये करणाऱ्या अंगुलीमालाला बुद्धांनी करुणा आणि मेत्ताभावनेच्या माध्यमातून धम्ममार्गावर आणले. त्याने भिक्खुसंघाची दीक्षा स्वीकारली आणि क्रौर्याचा त्याग केला. हा आशय या कवितेतून व्यक्त होतो. प्रस्तुत संग्रहातील प्रत्येक कवितेच्या समोरच्या पानावर आशय स्पष्ट करणारी चित्रे देण्यात आली आहेत. त्यामुळे बालकांना कविता समजून घेणे सोपे होते. कवितांना सुरेल आणि लयबद्ध संगीताची जोड मिळाल्यास त्यांचा परिणाम आणखी व्यापक होऊ शकतो. संग्रहाचे मुखपृष्ठही आकर्षक असून करुणा आणि मैत्रीचा संदेश देणारे प्रतिकात्मक चित्र त्यावर साकारले आहे. हंस, कंथक आणि नालागिरी या प्रतिमांमधून जीवदया, त्याग, करुणा आणि परिवर्तनाची मूल्ये प्रभावीपणे व्यक्त होतात. एकूणच, ‘सिद्धार्थाचा हंस’ हा बालकवितासंग्रह आंबेडकरी साहित्यपरंपरेतील महत्त्वपूर्ण योगदान ठरतो. बुद्धांच्या जीवनातील निवडक प्रसंगांच्या माध्यमातून बालमनावर करुणा, मैत्री, अहिंसा, त्याग, विवेक, समता आणि माणुसकीचे संस्कार रुजविण्याचे काम कवीने केले आहे. डिजिटल माध्यमांच्या प्रभावाच्या काळात मुलांना मूल्याधिष्ठित वैचारिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा संग्रह निश्चितच स्वागतार्ह आहे.वाचक, अभ्यासक तसेच बालमित्र-मैत्रिणी ‘सिद्धार्थाचा हंस’ या बालकुमार कवितासंग्रहाचे निश्चितच मनःपूर्वक स्वागत करतील, असा विश्वास वाटतो. कवी पुरुषोत्तम संबोधी सरांच्या पुढील साहित्य प्रवासासाठी मनःपूर्वक हार्दिक सदिच्छा!●●






माया वासनकि गेडाम
मो. ८००७८५०६५६

**बालकुमार कवितासंग्रह : सिद्धार्थाचा हंस**
**कवी : पुरुषोत्तम संबोधी**
**प्रकाशक : समता संगर प्रकाशन, नागपूर**
**प्रथम आवृत्ती : १ मे २०२६ (बुद्ध जयंती)**
**सहयोग राशी : ₹५०/- फक्त**

## महत्वाचे




## न्यू कैलास नगरात SIR शिबिर

**नागपूर :** विधानसभा मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षन अंतर्गत निवडणूक आयोगाच्या दिशा निर्देशानुसार न्यू कैलासनगरातील डॉ. आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयात असलेल्या बुथ क्रमांक 123, 124, 125 व 127 या याद्यांचा एस आय आर करण्यात आला. याप्रसंगी पर्यवेक्षक एम एच गायकवाड, बीएलओ शिल्पा लभाने, विश्वास मेश्राम, मंगेश आदमने, शिल्पा बरगट तसेच बसपाचे बीएलए उत्तम शेवडे, हेमंत बोरकर, विलास मुन, शामराव तिरपुडे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच बूथ (मतदान) क्रमांक 126 या मानवता हायस्कूल मध्ये केंद्र असलेल्या रत्नमाला सोनकर या बी एल ओ असलेल्या न्यू कैलास नगर येथील मतदारांच्या यादीचा एस आय आर न्यू कैलास नगरातील मान्यवर कांशीराम सार्वजनिक वाचनालयात केला.

## तक्षशिला बुद्ध विहारात वर्षावासानिमित्त 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथाचे वाचन

**नागपूर :** संघचेतना उपासक-उपासिका संघ, चंद्रमणी नगर मार्ग क्र. २, एल प्लॉट क्र. १२, दक्षिण नागपूर येथील तक्षशिला बुद्ध विहारात आषाढी पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या वर्षावास कालावधीत दररोज सायंकाळी ६ वाजता बुद्ध वंदना, धम्म वंदना व संघ वंदना झाल्यानंतर 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पवित्र ग्रंथाचे वाचन आयोजित करण्यात आले आहे. तक्षशिला बुद्ध विहाराचे संस्थापक-अध्यक्ष तथा बौद्धाचार्य भगवान कांबळे हे ग्रंथवाचन करणार असून, त्यांनी श्रद्धावान उपासक-उपासिकांनी वर्षावासात धम्मदेशनेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.



## कळमेश्वरात 3 मेगावॅटचा सौर प्रकल्प सुरू 1,105 शेतकऱ्यांना दिवसा वीज

**नागपूर :** महावितरणच्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 अंतर्गत कळमेश्वर तालुक्यातील तोंडाखैरी येथे 3 मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते प्रकल्पाचे उद्घाटन झाले. या प्रकल्पामुळे 33/11 केव्ही कळमेश्वर उपकेंद्राअंतर्गत 1,105 कृषी ग्राहकांना दिवसा नियमित वीजपुरवठा मिळणार आहे.

यापूर्वी काटोल तालुक्यातील 4 मेगावॅटच्या प्रकल्पासह नागपूर ग्रामीण मंडळातील एकूण सौर ऊर्जा क्षमता आता 7 मेगावॅट झाली असून 2,079 शेतकऱ्यांना याचा लाभ मिळत आहे. या प्रकल्पामुळे सिंचनासाठी रात्री शेतात जाण्याची गरज कमी होणार, वीजपुरवठा अधिक विश्वासार्ह होणार आणि हरित ऊर्जेला चालना मिळणार असल्याचे महावितरणने सांगितले. उद्घाटन कार्यक्रमाला महावितरणचे वरिष्ठ अधिकारी व विश्वराज विदर्भ सोलर एनर्जी प्रा. लि. चे प्रतिनिधी उपस्थित होते.



## गौतम संतोष मानवटकर यांच्या प्रथमस्मृतिदिनी धम्मदान

**महादुला :** स्मृतिशेष गौतम संतोष मानवटकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त श्रद्धांजली, परित्राण, धम्मदान व सामूहिक भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मानवटकर कुटुंबीयांनी अनागारिक धम्मपाल बौद्ध विहार, महादुला येथील धम्मकार्याकरिता ५ हजारांचे धम्मदान महामाया महिला मंडळाच्या स्वाधीन केले. कार्यक्रमात गौतम मानवटकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. नातेवाईक, मित्रपरिवार व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्मृतिदिन समाजोपयोगी उपक्रमातून साजरा केल्याबद्दल विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मानवटकर कुटुंबीयांचे कौतुक व आभार व्यक्त केले.

## निधन वार्ता

### सावित्रीबाई नंदकिशोर गजभिये



**नागपूर :** इंद्रप्रस्थ नगर, वाघमारे ले आऊट निवासी सावित्रीबाई नंदकुमार गजभिये यांचे आजार पणामुळे आज दिनांक 7/8/2026 ला सायंकाळी 7:30 वाजता निधन झाले. दिनांक 8/8/2026 ला दुपारी 12 :00 वाजता सहकार नगर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# आंबेडकर सांस्कृतिक सभागृहासाठी निर्णायक एल्गार..

## जागेच्या हस्तांतरणासाठी प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टिमेटम

### १२ ऑगस्टपासून बेमुदत उपोषणाचा इशारा..



**सोलापूर :** निलंगा शहरातील अशोकनगर येथील गायरान जमीन सर्वे क्रमांक १७३ मधील २०० बाय १८० फूट जागा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक सांस्कृतिक सभागृहासाठी नगर परिषदेकडे हस्तांतरित करून संबंधित ७/१२ उताऱ्यावर आवश्यक नोंद करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते अंकुश ढेरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, निलंगा यांना निवेदन सादर केले आहे.

या मागणीवर आठ दिवसांच्या आत निर्णय न झाल्यास १२ ऑगस्ट २०२६ पासून उपविभागीय कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनानुसार, संबंधित जागेचा वापर गेल्या सुमारे चार दशकांपासून आंबेडकरी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी सातत्याने होत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, संत कबीर, संत गाडगे महाराज यांच्यासह विविध महामानवांच्या सार्वजनिक जयंती, सामाजिक कार्यक्रम आणि जनजागृतीचे उपक्रम याच ठिकाणी नियमितपणे आयोजित करण्यात येत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

नगर परिषदेनेही या परिसरात सुमारे २०० झाडांची लागवड केली असून, त्याच सर्वे क्रमांकात विविध समाजांच्या स्मशानभूमींची शासनाकडे नोंद आहे. त्यामुळे त्याच धर्तीवर आंबेडकर सांस्कृतिक सभागृहासाठीही जागेची अधिकृत नोंद करून ती नगर परिषदेकडे हस्तांतरित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात सांस्कृतिक सभागृह उभारणीसाठी आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होण्यास मदत होईल, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी आणि भावी पिढ्यांमध्ये सामाजिक प्रबोधनाची परंपरा अधिक बळकट करण्यासाठी स्वतंत्र सांस्कृतिक सभागृहाची गरज आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागणीकडे संवेदनशीलतेने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, १२ ऑगस्टपासून प्रस्तावित बेमुदत उपोषणामुळे या प्रश्नाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, प्रशासनाने वेळेत निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# तथागत बुद्ध विहार, प्रेरणानगर येथे वर्षावास प्रारंभ



**नागपूर :** तथागत बुद्ध विहार प्रेरणा नगर येथे आषाढ पौर्णिमेची ( गुरु पौर्णिमा ) सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी भन्ते सुमनपाल यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे दिपप्रज्वलन व माल्यार्पण करून धम्मदेशनेला सुरुवात करण्यात आली. 'तथागत भगवान गौतम बुद्धाने सारनाथ येथे पहिले धम्मचक्र प्रवत्तन केले. पाच भिक्कूना चार आर्यसत्य आणि आठ अष्टांगिक मार्ग यांचे मानवी जीवनातील महत्व सांगितले.' असे भन्ते सुमनपाल यांनी आपल्या उपदेशनेत सांगितले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. नाना शेंडे यांनी भन्तेचे स्वागत केले आणि उपासक उपासिका यांना मार्गदर्शन केले. या तीन महिन्याच्या कालावधीत दर शनिवारी वेगवेगळ्या धम्मसेवक - धम्मसेविका यांना बोलवून धम्मदेशना दिली जाईल, असे यावेळी अध्यक्षांनी सुचविले. यावेळी दानदाते हरेश्वर शहारे यांनी बुद्ध विहाराच्या वाचनालयासाठी दान देऊन सहकार्य केले. यावेळी संस्थेचे सचिव दिनकर खोब्रागडे यांनी सूत्रसंचालन केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता रमाई महिला मंडळाच्या संध्या देवगडे, संगीता मेश्राम, शिल्पा गावंडे, कमल शेंडे, सुरेखा शंभरकर, रिद्धीमा माटे, कल्पना तागडे, दिक्षा दमके, संगीता दमके, बेबी दमके, मधुशीला बांबोडे, वंदना मेश्राम, बापूराव तागडे, डॉ. विलास धबाले, राजकुमार पाटील यांनी सहकार्य केले. यावेळी सर्व रमाई महिला मंडळाच्या महिलांनी भन्तेना दान दिले. शिवाय मोठ्या संख्येने उपासक - उपासिका वर्ग उपस्थित होता.



# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा उत्तर नागपूरद्वारे वृक्षारोपण व पंधरवाडी बैठक

**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा उत्तर नागपूरद्वारे वृक्षारोपण आणि पंधरवाडी बैठक बुधवारला उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामभाऊ डोंगरे होते. अध्यक्षीय भाषणात - रामभाऊ डोंगरे राज्य कार्यकारिणी सदस्य यांनी संघटनेचे येणारे पुढील उपक्रम, मीटिंग, कार्यक्रम आणि पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणासारखे उपक्रम समाजाला प्रेरणा देणारे असल्याचे सांगितले.

वृक्षारोपण कार्यक्रमात विहाराच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. आजच्या दिवशी माया बोंदाडे यांचा बर्थ डे असल्यामुळे त्यांचे स्वागत पुस्तके व झाड देऊन जन्मदिन साजरा केला. त्याचप्रमाणे त्यांचे हाताने सर्व प्रथम वृक्षारोपण केले. त्यानंतर बरीच झाडे चित्तरंजन चौरे, देवानंद बडगे, विभुतीचंद्र गजभिये, चंद्रशेखर मेश्राम, अशोक बोंदाडे, वर्षा सहारे, यशवंत घोडके, शीला डोंगरे, दिप्ती नाईक, शारदा मोटघरे, वर्षा टेंभेकर, त्रिशला बोदले, सुनंदा उके, सुनीता ढवळे, वंदना टेंभुर्णे, नालंदा पजारे, अशोक रंगारी, शांताराम उके, विवेक निमगडे, अरविंद तायडे, माया बोंदाडे, शारदा मोटघरे, वर्षा टेंभेकर, शारदा खोब्रागडे, अशोक राऊत, चंदा मोटघरे, आनंद मेश्राम, इंदिरा जांभूळकर, ज्ञानेश्वर चव्हाण, रमेश ढवळे.

कार्यक्रमाच्या शेवटी नवीन सदस्यांचा पुस्तक देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन वर्षा सहारे तर आभार प्रदर्शन अशोक बोंदाडे यांनी केले. यावेळी नाश्ता माया बोंदाडे यांनी दिला तर चहा शाखेकडून दिला.

# म. रा. का. वि. सोसायटी रुग्णालय, नागपूर येथे अत्याधुनिक दंत विभाग, शल्यक्रिया गृह व प्रसूती कक्षाचे लोकार्पण

**नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालय, सोमवारी पेठ, नागपूर येथे आज अत्याधुनिक दंत विभाग, शल्यक्रिया गृह (Modular Operation Theatre) आणि प्रसूती कक्ष (Labour Room) यांच्या उद्घाटनाचा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या शुभहस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे केले.

यानंतर नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे, दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते, उपमहापौर लीला हातीबेड तसेच महानगरपालिका आरोग्य विभागाचे उपसभापती श्रीकांत आगलावे यांनी रुग्णालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून रिबीन कापून नव्या सुविधांचे लोकार्पण केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली व्यवहारे यांनी प्रास्ताविकातून कर्मचारी राज्य विमा योजनेचा इतिहास, महाराष्ट्रातील ESI सेवेचे पहिले केंद्र म्हणून नागपूरचे ऐतिहासिक महत्त्व आणि नव्याने सुरू करण्यात आलेल्या सुविधांमुळे विमाधारक



कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना मिळणाऱ्या दर्जेदार आरोग्यसेवेचा आढावा मांडला.

या आधुनिक सुविधा उभारण्यासाठी आणि प्रकल्प यशस्वीपणे पूर्णत्वास नेण्यासाठी महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीचे आयुक्त रमेश चव्हाण, प्रशासकीय संचालक सोहम वायळ तसेच वैद्यकीय संचालक डॉ. अशोक थोरात यांनी केलेले मार्गदर्शन, नियोजन आणि विशेष सहकार्य मोलाचे ठरले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि सातत्यपूर्ण पाठबळामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्षात साकार झाला असून, याबद्दल कार्यक्रमात त्यांच्याप्रती विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

या नव्या सुविधांमुळे नागपूर व विदर्भातील हजारो विमाधारक कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना अधिक आधुनिक, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध होणार असून कर्मचारी राज्य विमा सेवेच्या बळकटीकरणाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. या कार्यक्रमाचे संचालन डॉ हर्षवर्धन कांबळे वैद्यकीय अधिकारी आणि आभार प्रदर्शन डॉ. किशोर गिरी निवासी वैद्यकीय अधिकारी यांनी केले.

या कार्यक्रमास रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, अधिकारी, कर्मचारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्षावास प्रारंभ व प्रवचनमालाचे उद्‌घाटन

**पुणे :** भारतीय बौद्ध महासभा पुणे या धार्मिक संस्थेचा वर्षावास प्रारंभ व प्रवचनमाला उद्घाटन समारंभ नुकताच धम्मक्रांती बुद्ध विहार गांधीनगर येरवडा पुणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवातीला तथागत भगवान बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक बुद्ध वंदना घेतली. जिल्हा समता सैनिक दलाच्या वतीने जयभीम सलामी देण्यात आली. भन्ते एस. प्रियदर्शी यांनी प्रवचनमालेचे उद्‌घाटन झाल्याचे जाहीर करून वर्षावासाचे महत्त्व विशद केले. स्वागताध्यक्षा शारदा ओव्हाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष के. बी. मोटघरे यांनी संस्थेच्या माध्यमातून होणारे निरनिराळे उपक्रम व त्यासाठी प्रयत्न करणारे धम्म प्रचारक यांचे कौतुक केले. महिलांनी धम्मकार्यात सक्रिय होण्यासाठी त्यांनी आवाहन केले. याप्रसंगी उपासिका प्रगती कांबळे व सुजाता चव्हाण यांना महिला बौद्धाचार्य प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले व



विमल धवणे व मंगल जाधव यांना महिला विभागात नियुक्तीपत्र देण्यात आली. हवेली तालुका पदाधिकारी यांची पुर्नबांधणी करून संदीप शेलार, विजय दाभाडे, बलभीम बाळशंकर, दत्ता शेलार, ईश्वर गायकवाड यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डी. एन. धाईंजे यांनी वर्षावास काळात पुणे शहरातील विविध विहारात नवनवीन प्रवचनकाराने अभ्यासपूर्ण प्रवचने देऊन धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक त्रिभुवन, राष्ट्रीय सचिव भीमराव वाघमारे व जिल्हाध्यक्ष एन. जी. शिंदे, महिला जन.सेक्रेटरी सायली शिंदे, यांनी मनोगतामध्ये वर्षावासाच्या शुभेच्छा दिल्या. प्रमुख उपस्थितांमध्ये धम्मक्रांती बुद्ध विहाराचे संस्थापक सुभाष आल्हाट, अध्यक्ष संतोष मोरे व महिला अध्यक्षा कुंदा खैरे, भारतीय बौद्ध महासभेचे आरोग्य प्रमुख डॉ. सुरेश कठाणे, योगाप्रमुख नामदेव इंगळे, महिला संस्कार प्रमुख सुनंदा गायकवाड, पर्यटन विभाग प्रमुख महेंद्र बाराथे व सहायक मिलिंद सोनकांबळे, हवेली तालुका अध्यक्ष संदीप शेलार, मावळ तालुका अध्यक्ष डॉ. अमर चौरे, प्रबुद्ध प्रेरणा विहाराचे अध्यक्ष अशोक औचरे व महिला अध्यक्षा अलका गायकवाड, बौद्धाचार्य निलेश गायकवाड, राजेश गायकवाड, रामदास सोनवणे, डी. डी. जाधव, सचिव जयमाला माने, कोषाध्यक्षा माया धेंडे, रोहीणी जाधव, ज्योती सोनवणे, अलका बनसोडे, अविनाश जगताप, अशोक धों. औचरे होते. कार्यक्रमाचे संचालन सचिव संदीप सोनवणे यांनी केले आणि आभार कोषाध्यक्ष राजेश माने यांनी मानले.

# तथागत बुद्ध विहार परिसरात फळझाडांची लागवड



**नागपूर :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणे गरजेचे असून, प्राणिमात्रांसाठी सावली, फळे आणि स्वच्छ पर्यावरण मिळावे यासाठी प्रत्येकाने झाडे लावावीत, असे आवाहन नाट्यकलावंत दिवाकर शिर्के यांनी केले. नाट्यकलावंत दिवाकर शिर्के यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त काशी नगर, नागपूर येथील तथागत बुद्ध विहार परिसरात फळझाडांची लागवड करण्यात आली. शताब्दी चौक परिसरातील तथागत बुद्ध विहार येथे 'धम्म सकाळ' उपक्रमाचा एक भाग म्हणून हा वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बोलताना प्रा. भीमराव गायकवाड म्हणाले, "या आषाढ महिन्यात प्रत्येक व्यक्तीने किमान एक झाड लावावे. मी एक झाड लावले, हा संकल्प प्रत्येकाने केला पाहिजे." भदंत नागदीपंकर यांनी बुद्धवंदना घेतली. परिवर्तन विचार मंचच्या वतीने पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेला नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, पर्यावरण संवर्धनाची चळवळ लोकसहभागातून पुढे जात आहे, असे लेखक विलास गजभिये यांनी सांगितले. दिवाकर शिर्के यांनी तथागत बुद्ध विहाराला धम्मदानासोबत संत्रा आणि आंब्याची रोपे दान दिली. "आयुष्याच्या सुख-दुःखाच्या प्रवासात वृक्ष हे आपले खरे मित्र आहेत. त्यामुळे वृक्षांचे संगोपन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे," असे सुधाकर स्थूल यांनी सांगितले. कार्यक्रमाला रिपब्लिकन नेते नानाजी ढेंगरे, कृषिमित्र यशवंत जनबंधू, प्रसिद्ध नाट्यकलावंत शीतल दोडके, शिल्पा मकेश्वर, वनश्री पाटील तसेच तथागत अभ्यासिकेतील विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला.

# हिरोशिमा दिनानिमित्त अणुयुद्धाविरोधी जनजागृती






**नागपूर :** सिंधू नवयुवक मंडळाच्या राजकुमार केवलरामानी कन्या महाविद्यालय, नागपूर येथील समाजशास्त्र विभागाच्या वतीने हिरोशिमा दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ व्याख्याते डॉ. युगल रायलू यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी समाजशास्त्र विभागाच्या प्रा. माधवी मोहरील यांनी हिरोशिमा दिनाचे ऐतिहासिक महत्त्व विशद केले तसेच प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. युगल रायलू यांनी सुमारे ४० मिनिटांच्या पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे हिरोशिमा व नागासाकीवरील अणुबॉम्ब हल्ल्याची भीषणता विद्यार्थिनींसमोर उलगडून सांगितली. पोस्टर्स व छायाचित्रांच्या माध्यमातून अण्वस्त्रांचा मानवी जीवन, पर्यावरण आणि संपूर्ण पृथ्वीवर होणारा विनाशकारी परिणाम स्पष्ट केला. तसेच अणुयुद्ध टाळून जागतिक शांतता प्रस्थापित करण्याची आजची गरज अधोरेखित केली. संवाद सत्रात विद्यार्थिनींनी विविध प्रश्न विचारले. यावेळी सर्व विद्यार्थिनींनी 'आम्हाला युद्ध नको, शांतता हवी' असा एकमुखी संदेश देत जागतिक शांततेचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमांच्या सरतेशेवटी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनिता चांदवाणी यांनी आपले मनोगत व्यक्त करून शांतता, मानवता आणि सहअस्तित्वाची मूल्ये जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. रजनी हरोडे यांनी मानले.

# सीआयओची पर्यावरण मोहीम यशस्वी

## 22 शाळांचा सहभाग

**नागपूर :** जमाअत-ए-इस्लामी हिंदच्या चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशन (सीआयओ)तर्फे आयोजित पर्यावरण मोहिमेचा समारोप जाफरनगर येथील मर्कझे इस्लामी हॉलमध्ये झाला. मोहिमेत वृक्षारोपण, सीड बॉल कार्यशाळा तसेच 22 शाळांमध्ये मॉडेल व पोस्टर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी नाविन्यपूर्ण कल्पना सादर केल्या. विजेत्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. पर्यावरण संरक्षणासाठी स्वच्छता, वृक्षारोपण आणि जनजागृतीची गरज असल्याचा संदेश यावेळी मान्यवरांनी दिला.

# विद्यार्थ्यांनो व्यसनांपासून लांब राहा : गौरव आळणे



**महादुला :** येथील वत्सलाबाई काळे प्राथमिक शाळेमध्ये नशा मुक्त भारत अभियाना अंतर्गत सामाजिक न्याय विभाग व उत्कर्ष बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ते अंकुश चरडे यांचा कलम ४७ चे स्मृतिचिन्ह व महामानवांचे व्यसनमुक्तीपर विचार पुस्तिका भेट देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उत्कर्ष बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक तथा नशामुक्त भारत अभियानाचे मास्टर व्हॅलेंटियर गौरव आळणे यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे प्रकार, दुष्परिणाम व त्यावरील उपायांची माहिती दिली. सोबतच विद्यार्थ्यांना सामाजिक युवा कार्यकर्ते सत्कारमुर्ती अंकुश चरडे यांनी व्यसनमुक्तीचा संकल्प दिला.

यावेळी कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा जंजाळ, सुनील बोबडे, शिक्षक वृंद, कर्मचारी व शेकडो विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका कविता आमलेकर तर आभार प्रसाद वडस्कर यांनी मानले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648